शुक्रवार, २५ नोव्हेंबर २०२२
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१०४
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • FRIDAY 25 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-104 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-10 • PRICE-5

## यळकोट यळकोट जय मल्हार



औरंगाबादच्या सातारा या गावी खंडोबाचे प्राचीन मंदिर आहे. बुधवारपासून खंडोबा मंदिरात नवरात्र उत्सवास प्रारंभ झाला. २९ तारखेला चंपाषष्ठी महोत्सव भक्तिभावाने साजरा केला जातो. आज खंडोबाच्या मूर्तीला फुलांनी सजविण्यात आले होते. छायाचित्र : सुधीर कोर्टीकर

# 'कर'नाटक सुरूच

## बोम्माई यांचा सोलापूर, अक्कलकोटवरही दावा

आधुनिक केसरी न्यूज

**बंगळुरू : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल महाराष्ट्राचे एकही गाव कर्नाटकला देणार नाही, असे स्पष्ट केल्यानंतर कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्माई यांनी पुन्हा ट्वीट करुन मराठी भाषिक आणि महाराष्ट्राला डिवचण्याचा प्रयत्न केला आहे. कन्नड भाषिक बहुसंख्य असलेले अक्कलकोट आणि सोलापूर कर्नाटकात विलीन करावेत अशी मागणी करुन कर्नाटकची एक इंच भूमी कोणाला देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. देवेंद्र फडणवीस यांचे स्वप्न कधीही पूर्ण होणार नाही, असे म्हटले. तसेच कर्नाटक आपल्या भूमीचे, पाण्याचे आणि सीमांचे रक्षण करण्यास कटिबद्ध आहे, असेही कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्माई यांनी आपल्या ट्वीटमध्ये म्हटले आहे.**

### पाकव्याप्त काश्मीर जिंकल्यावर १०० गावे महाराष्ट्राला देऊ ; उद्धव ठाकरेंनी उडवली शिंदेंची खिल्ली



कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी महाराष्ट्रातील ४० गावांवर दावा सांगितल्याच्या मुद्द्यावरुन सुरु असलेल्या राजकीय वादात आता शिवसेना पक्षप्रमुख (ठाकरे गट) उद्धव ठाकरे यांनी उडी घेतली आहे. या मुद्द्याला हात घालताना उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची चांगलीच खिल्ली उडविली. कर्नाटकचे मुख्यंत्री महाराष्ट्रातील गावांवर दावा सांगतात. महाराष्ट्राच्या अस्मितेचा आणि दैवतांचा अपमान होत आहे. पण मुख्यमंत्र्यांना त्याची कोणतीही खंत किंवा चिंता नाही. काहीतरी गोलमाल उत्तर देऊन ते वेळ मारून नेतात. या राज्याला मुख्यमंत्री आहे का तेच कळत नाही. ते कधीही बोलतच नाहीत. महाराष्ट्रातील ४० गावं कर्नाटकमध्ये जात असतीत तर मुख्यमंत्री नेहमीच्या शैलीत उत्तर देतील. ते म्हणतील, काळजी करु नका. मी पंतप्रधानांना फोन केला होता. त्यांनी सांगितले आहे की, कर्नाटकने महाराष्ट्रातील ४० गावे घेतली तर घेऊ दे. आपण पाकव्याप्त काश्मीर जिंकल्यावर १०० गावं महाराष्ट्राला देऊ, असं कदाचित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सांगतील. त्यांच्याकडून कोणतीही अपेक्षाच नाही. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेदेखील सारवासारव करत आहेत.

### शरद पवार : बेळगाव, कारवार, निपाणीसह गावे ते सोडणार असतील तर ...



कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रातील काही गावांवर दावा केला आहे. परंतु आम्ही बरीच वर्षे बेळगाव, कारवार, निपाणी यासह इतर गावे मागत आहोत. त्यामध्ये आमचे सातत्य आहे. आता कर्नाटकचे मुख्यमंत्री महाराष्ट्रातील काही गावे मागत आहेत परंतु बेळगाव, कारवार, निपाणीसह ते सोडणार असतील तर त्यांना काय देता येईल यावर चर्चा होऊ शकते मात्र काही न करता कशाचीही मागणी करणे हे शहाणपणाचे लक्षण नाही, अशा शब्दात शरद पवार यांनी कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना सुनावले आहे. मी काही ज्योतिषी नाही त्यामुळे त्याबद्दल मी काही सांगू शकणार नाही कारण अशा गोष्टीवर माझा विश्वास नाही त्यामुळे मी जागा सोडून हात दाखवायला कुठे जात नाही असा उपरोधिक टोला शरद पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलताना लगावला. राज्यात आल्यापासून अनेक गोष्टीवर वादग्रस्त विधान करण्याचा राज्यपालांचा लौकिक आहे. चुकीची विधाने करून समाजात गैरसमज वाढेल कसा याची खबरदारी घेणे असंच मिशन राज्यपालांचे आहे का? याबद्दल शरद पवार यांनी शंका व्यक्त केली.

### कर्नाटकचे मुख्यमंत्री न्यायालयापेक्षा मोठे नाहीत : फडणवीस



महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नासाठी आम्ही सर्व पुराव्यांसह सर्वोच्च न्यायालयात गेलो आहे. न्यायदेवतेवर आमचा विश्वास असून सर्वोच्च न्यायालय यावर योग्य निर्णय घेईल. सर्वोच्च न्यायालयापेक्षा कोणीच मोठं नाही. कर्नाटकचे मुख्यमंत्री देखील सर्वोच्च न्यायालयापेक्षा मोठे नाहीत. आमचा भाग आम्हाला मिळणारच आहे, असा पलटवार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. याबरोबरोबरच पक्षाचा वाद कोणीही सीमा प्रश्नात आणू नये, असे आवाहन देखील यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. ते मुंबईत माध्यमांसोबत बोलत होते. महाराष्ट्रातील एकही गाव बाहेर जाणार नाही आणि आमचा भीमा भाग आम्हाला परत मिळेल. बेळगाव, निपाणी आणि कारवार हा आमचा भाग आहे. ही आमची भूमिका आहे. आमची ही भूमिका आम्ही न्यायालयात माडंली आहे. कायद्याच्या चौकटीत आम्ही मागणी केली आहे. परंतु,यात कोणीही राजकारण आणू नये. या पूर्वी सर्वात जास्त काळ कर्नाटक आणि महाराष्ट्रात देखील काँग्रेस आणि मित्र पक्षांचं सरकार होतं. परंतु, त्यांच्याकडून हा प्रश्न सुटला नाही. आम्ही हा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करत आहोत. सीमा प्रश्नावरून कोणीही राजकारण करू नये. प्रत्येकाने याबाबत बोलताना विचार करून बोललं पाहिजे. आजपर्यंत पक्षाचा वाद सीमा वादात आणला नाही. सीमा भागासाठीचा आपला लढा सुरूच राहील, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. दरम्यान, कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्माई यांनी आज सकाली पुन्हा ट्वीट करुन मराठी भाषिक आणि महाराष्ट्राला डिवचण्याचा प्रयत्न केला आहे.

# असिम मुनीर पाकचे नवे लष्कर प्रमुख

आधुनिक केसरी न्यूज



**दिल्ली :** लेफ्टनंट जनरल असिम मुनीर यांची पाकिस्तानचे नवे लष्कर प्रमुख म्हणून निवड करण्यात आली आहे. मुनीर यांनी यापूर्वी पाकिस्तानच्या गुप्तचर यंत्रणेनसाठी म्हणजेच इंटर सर्व्हिस इंटेलिन्स अर्थात आयएसआयसाठी काम केलेलं आहे. लेफ्टनंट जनरल साहीर शमशेद मीर्जा यांची नियुक्ती जॉइंट चीफ्स ऑफ स्टाफ कमिटीच्या (सीजेसीएसी) अध्यक्ष पदावर करण्यात आली आहे. पाकिस्तानचे विद्यमान लष्करप्रमुख जनरल कमर जावेद बाजवा यांचा कार्यकाळ २९ नोव्हेंबर रोजी संपुष्टात येत आहे. बाजवा यांना तीन वर्षांचा अतिरिक्त कार्यकाळ वाढवून देण्यात आला होता. २०१६ साली त्यांची तीन वर्षांसाठी पाकिस्तानच्या लष्करप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली होती. नंतर त्यांना तीन वर्षांची मुदतवाढ देण्यात आली होती. त्यांना पुन्हा एकदा मुदतवाढ देण्याचा सरकारचा विचार होता मात्र त्यांनी यासाठी नकार दिला. माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्यावर झालेला हल्ला आणि त्यांनी काढलेल्या रॅलीमुळे सध्या पाकिस्तानमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण झालेली आहे.

# लाडाची लेक झाली अधिकारी, पित्याच्या डोळ्यात आनंदाचे अश्रू !

## परिस्थितीवर मात करत मुलीने केले आईवडीलांचे स्वप्न साकार

आधुनिक केसरी न्यूज

बंडू खडांगळे

**दिंडोरी :** दिंडोरी व चांदवड तालुक्याच्या सीमेवर असलेला रामायेसूपाडा (ता. चांदवड) या छोट्याशा आदिवासी पाडयावरील अल्पभूधारक शेतकन्याच्या लेक लता बागूल जिद्द, चिकाटी व कठोर परिश्रमाच्या जोरावर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पोलिस उपनिरीक्षक पदाची परीक्षा उत्तीर्ण होत यशाला गवसणी घातली. या यशासह तिने आपल्या आई वडीलांचे अधिकारी होण्याचे स्वप्न साकार केले. अवघ्या दोनशे लोकसंख्या असलेल्या रामायेसुपाडा (पारेगाव) येथील कोंडाजी बागुल व विमल बागूल हे अल्पभूधारक शेतकरी दांपत्य लता ही दोन नंबरची मुलगी. लता ही लहानपणापासून हुशार, जिंदी, अभ्यासू मुलगी. तिचे प्राथमिक शिक्षण गावात रामायेसूपाडा येथे, माध्यमिक शिक्षण पारेगाव येथील जनता विद्यालयात झाले. यानंतर पुढील शिक्षणासाठी चांदवड येथील होळकर ज्यूनियर कॉलेजला ११ वी व १२ वी व बीएस्सी, एस. पी. एच. जैन सायन्स कॉलेज चांदवड येथेच २०१९ ला पूर्ण केले. या प्राथमिक ते पदवीपर्यंतच्या शैक्षणिक प्रवासात प्राथमिक शिक्षक श्री. चौधरी, श्री. बच्छाव आणि श्री. सोनवणे यांनी लता हिचा प्राथमिक शिक्षणाचा पाया भक्कम केला. माध्यमिक शिक्षक नरेंद्र वड व एस. एस. पठाडे यांनी स्पर्धा परीक्षेची लता मध्ये आवड निर्माण केली. अकरावी विज्ञान शाखेत प्रवेश घेतल्यानंतर सर्व विषय इंग्रजीत असल्याने काहीसे डोक्यावरून जात होते, पण माहिती होतं कष्ट अटळ




आहे म्हणून मी जिथे तिथे न डगमगता अभ्यास केला. चांगल्या गुणाने उत्तीण झाल्याने लताला विद्यापीठाची शिष्यवृत्ती मिळाली, व त्या शिष्यवृत्तीचा पुढील शिक्षणासाठी योग्य वापर करण्यास करण्याचे लताने ठरवत, केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी पुणे गाठले. घरच्यांनी देखील तिला पूर्ण पाठिंबा दिला. दोन वेळा युपीएससीची लताने परीक्षा दिली, पण अपयश आले. त्यातच कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्याने पुण्यातून घरी यावे लागले. कोरोना काळात पूर्ण अभ्यास केला. त्यामूळे सतत अभ्यासात सातत्य ठेवले गेले. युपीएससीच्या परीक्षेत अपयश आल्याने एमपीएससीची परीक्षा देण्याचा निर्णय घेवून आता यश मिळाल्या शिवाय घरी न परतण्याचा निर्धार करीत लताने पुन्हा पुणे गाठले. व तेथे सात आठ महिन्यात अभ्यासाचे योग्य नियोजन, योग्य मार्गदर्शन मिळवत राज्य उत्पादन शुल्क पोलिस उपनिरीक्षकाची परीक्षा दिली. आणि पहिल्याच प्रयत्नात लताने यशाला गवसनी घातली.

आई – वडिलांनी दाखविलेला विश्वास, शिक्षकासह नातेवाइकांनी केलेले मार्गदर्शन आणि मित्र मैत्रिणींची साथ, मोबाईलचा अभ्यासाच्या संदर्भासाठी व मार्गदर्शन मिळविण्यासाठीच केलेला वापर, यामुळे मी हे यश संपादन करू शकले. यासाठी मेहनत व प्रामाणिक प्रयत्न आवश्यक आहेत. ग्रामीण भागातून असल्याचा कमीपणा किंवा भीती न बाळगता जिद्दीने प्रयत्न केल्यास यश नक्कीच मिळते.

**– लता बागूल, पोलिस उपनिरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क**

लहानपनापासूनच लता हुशार होती. तिला शिक्षणाची आवड होती. ती काहीतरी करून दाखवणार हा विश्वास होता म्हणून कौटुंबिक अन्य खर्चात काटकसर करून सर्वातोपरी मदत केली आणि तिने तिचे चीज करून दाखविले.

**– कोंडाजी बागूल, लताचे वडील**




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# स्वामीकृपा

आधुनिक केसरी

रंजनाताई तर अतिशय प्रेमळ होत्या. त्यांनी रेश्माची मोठ्या आस्थेने चौकशी केली आणि तिला येथे येत जा म्हणून सांगितले. दुसऱ्या दिवशी गुरुवार होता. रेश्माने मेथीचे लाडू बनवण्याचे ठरवले होते. तिच्या मनात आले की स्वामींना मेथीच्या लाडूंचा नैवेद्य दाखवावा. पण कडू मेथीचे लाडू स्वामींना चालतील का असं तिने रंजनाताईंना विचारलं. त्या म्हणाल्या, ' स्वामी म्हणजे माउली. त्यांना प्रेमाने तू जे देशील त्याचा ते स्वीकार करतील. ' हे ऐकून रेश्माला मोठा आनंद झाला.

रात्री नितीन घरी आल्यावर तिने ही सगळी हकीगत त्याला सांगितली. त्यालाही खूप आनंद झाला. दुसऱ्या दिवशी रेश्माने लवकर उठून सगळी कामे आटोपली आणि स्वामींसाठी मेथीचे लाडू मोठ्या मनोभावे बनवले. रंजनाताईंनी तिला सकाळी बारा वाजेच्या आत नैवेद्य घेऊन ये असे सांगितले



होते. कारण एकदा स्वामींचे नैवेद्य, जेवण आणि विदा झाला की नंतर ते काही घेत नाहीत. म्हणून तिची धावपळ सुरु होती. ती आता तयार होऊन निघणार, तेवढ्यात तिला एक फोन आला. एका ताईंची नुकतीच डिलिव्हरी झाली होती आणि त्यांना मेथीच्या लाडवांची तातडीने आवश्यकता होती. तेव्हा तिला आता मोठा प्रश्न पडला. त्या आईला मेथीचे लाडू देणे जास्त गरजेचे आहे, असे तिला वाटले आणि तिने मनोमन स्वामींची क्षमा मागून ते लाडू त्या बाईला नेऊन दिले. रंजनाताईंना भेटून तिने त्याबद्दल सांगितले. त्या म्हणाल्या हरकत नाही. त्या बाईंची गरज आधी भागवली ते छान झाले. रेश्मा म्हणाली, ' पुढच्या गुरुवारी मी स्वामींसाठी डिंकाचे लाडू घेऊन येईन. ' आता रेश्माला स्वामींच्या कृपेने कामाच्या ऑर्डर्स मिळणे सुरु झाले होते. होता होता गुरुवार आला. रेश्माने स्वामींना कबूल केल्याप्रमाणे डिंकाचे लाडू बनवले. पण यावेळीही मागच्या सारखेच घडले. ती लाडू घेऊन नैवेद्य दाखवायला जाणार, तोच तिला एका घरून डिंकाच्या लाडवांची ऑर्डर आली. ती व्यक्ती आजारी असून डॉक्टरांनी तिला डिंकाचे लाडू घेण्याचा सल्ला दिला होता. **क्रमशः**



# आनंदी पहाट

## सधन होण्याचे साधन महत्वाचे

आधुनिक केसरी

घरगुती बचत हा विषय सर्व परिचित आणि तरीही अनेकदा दुर्लक्षित राहणारा असल्याचं दिसून येतं. घरगुती बचत करणं खरं तर अगदी कोणालाही सहज शक्य होऊ शकतं. त्यासाठी काटकसर करणं हा काही समाधानकारक पर्याय होत नाही. आपल्या दैनंदिन गरजा यथायोग्य भागवून देखील ठराविक रक्कम आपण बचतीसाठी शिल्लक ठेवू शकतो अथवा ती बाजूला काढून ठेऊ शकतो. यासाठी सहज शक्य होणारी काही पथ्य आपण पाळू शकतो. आपल्या हाती असलेली रक्कम एकाच ठिकाणी न ठेवता थोडी-थोडी करून वेगवेगळी ठेवल्यास खर्चासाठी नेमके किती पैसे आपल्याकडे आहेत याचा हिशेब आपण करत बसत नाहीत किंवा करण्यासाठी तेवढा वेळ देऊ शकत नाही. अशावेळी हाती लागणाऱ्या एकाच ठिकाणच्या पैशाचा वापर आपल्याकडून होतो आणि इतरत्र ठेवलेली रक्कम शिल्लक राहते. सद्यःस्थितीत अनुभवायला येणाऱ्या घरफोड्या अथवा भुरट्या चोऱ्या यापासून देखील आपलं मोठ्ठे नुकसान टळू शकतं. कारण आपण एकाच ठिकाणी एक रकमी पैसे ठेवणं टाळणार आहोत.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

स्वतःजवळ असलेल्या पैशातून नेहेमी केवळ मोठ्या नोटा खर्चासाठी वापराव्यात. आणि लहान नोटा बाजूला ठेवून द्याव्यात. जसे दहा रुपयांच्या आपल्याजवळ येणाऱ्या नोटा शक्यतो खर्च न करता राखून ठेवाव्यात आणि गरजेप्रमाणे नेहेमी पन्नास, शंभर, दोनशे, पाचशे अथवा दोन हजारच्याच नोटा वापराव्यात. असं करण्यामुळे आपसूकच प्रत्येक दहाची नोट राखून ठेवली जाते आणि एकप्रकारे बचतच होते. "पैसा हे साधन आहे, निश्चितच ते साध्य असू नये" हे जरी सत्य असलं तरीही ते साधन साध्य करण्यासाठी विविध साधनं कशाप्रकारे वापरावीत हे समजून घेणंही सद्यःस्थितीत तितकेच आवश्यक आहे.



आधुनिक केसरी

## ठाव दे केशवा | चरणासी ||

देखिले म्या डोळा | मंगल चरण ||
रूप ते सगुण | कैवल्याचे ||१||
चंदन कस्तुरी | शोभे भाळावरी ||
तुळस मंजिरी | रूळे गळा ||२||
विटेवरी उभा | देव भक्तांसाठी ||
चंद्रभागे तटी | परब्रह्म ||३||
मना लागे ओढ | देह हा पंढरी ||
चैतन्याची वारी | श्वास झाला ||४||
आता कैसी आस | उरली न देवा ||
ठाव दे केशवा | चरणासी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी

## भक्ती

कलियुगी मार्ग जाणे। काया वाचा आणि मने।।
जगदंबेसी भजणे। प्राणिजाते प्रतिदिने।।
बोलती शास्त्रपुराणे। कलियुगीची तरणे।।
चंडीविनायक भजणे। चंद्रहास ठेवी ध्याने।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

# ।। दासबोध स्तवन ।।

## ब्रम्हनिरूपण

आधुनिक केसरी

परमार्थ साधना करत असताना "मी"या शब्दाला खूपच महत्व आहे. परमेश्वराला "मी"पणा आवडत नाही. मग मला सांगा मित्रांनो संसारात राहून सर्व कर्म करत राहूनजर तुम्ही परमार्थ करत असाल तर तुम्ही परमात्म्याशी एकरूप आहात हेच सिध्द होते. "मी खरा कोण आहे"हे न कळणं म्हणजे अज्ञान होय. ते अज्ञान नाहीसे झाले की परब्रम्ह सहज भेटतो. व्यवहारी जगातील देहबुध्दीतील मोठेपणाला ब्रम्ह स्वरूपाच्य ठिकाणी काही किंमत नसते. कारण देहबुध्दीतील अहंभाव टाकून द्यायचा आहे.व आपल्याला जे परमात्म्याशी एकरूप व्हायला हवे. ब्रम्हस्वरूपाच्या जवळ ऊंच्चनीच असाभेदभाव नसतो.देवाला सगळी लेकरं सारखेच असतात.राजाला ऊत्तम ब्रम्ह व त्याच्या नौकरांना हलके ब्रम्ह असा फलक ब्रम्ह कधीही करत नाही.समर्थांचे तत्वज्ञान हे व्यापक,भेदरहित सूक्ष्म आणि अतिमानवी आहे. मानवी जीवन हे भेदाने भरलेले आहे.स्वस्वरूपानुभव अभेदाने भरलेले असते.यासर्वाची सांगड घालण्यासाठी "दासबोध "वाचलाच पाहिजे।



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

सद्गुरुला जे ब्रम्हपद मिळते ते प्रत्येक शिष्याला पण प्राप्त होते."श्रुतीचे वचन आहे की"ब्रम्ह एकच एक असे अद्वितीय आहे. ब्रम्ह कसे आहे? ब्रम्ह नवेजूने असे नाही. त्याला कालभेद मान्य नाही. "मी देह आहे" ही भावना असणे म्हणजे देहबुद्धी होय.
"मी आत्माच आहे"अशी बुद्धी होणे म्हणजे आत्मबुध्दी होय. देहबुध्दी हेअज्ञानाचे प्रधान लक्षण आहे तर आत्मबुध्दी हे आत्मज्ञानाचे प्रधान लक्षण आहे.देहबुध्दीतील जोरावर जीव आकुंचित होऊन दृष्याच्या नादी लागतो. तर आत्मबुध्दीच्या प्रकाशाने जीव खूप मोठा होऊन ब्रम्ह स्वरूपाशी, समरस होऊन जातो.माणसाची देहबुद्धी जुनाट आहे.ती सुटता सुटत नाही इतकेच नाही तर ती आत्मबुध्दी निर्माण होण्यासपरत परत आड येते. म्हणून माणसाने देहबुद्धी सोडावी.भगवंत आणि संत यांच्या पर्यन्त पोहचायचे आहे तर देहत्वाचे मीपण सोडले पाहिजे.

# मनाचे श्लोक

आधुनिक केसरी



ही जी सृष्टी भगवंताने उत्पन्न केली आहे तिची नक्कल म्हणजे चित्रकला होय. चित्रकाराने रंगविलेले चित्र खोटे असून जे खर्यासारखे भासते, त्याला उत्तम चित्र असे म्हणतात. भगवंताचे होऊन जी कला येईल ती खरी. भगवंताने आपल्याकडून जे करवून घेतले ती कला समजावी. जे कर्म भगवंताकडे न्यायला मदत करते ती कलाच होय. या कलेमध्ये मनाला गुंतविणे आणि उद्योगात राहणे ही भगवत्सेवाच आहे. मन म्हणजे कल्पनांचे मूर्त स्वरूप. मन चंचल आहे तोपर्यंत देहालासुद्धा स्वस्थता नाही. मनाची चलबिचल होते म्हणूनच अभ्यास करायला पाहिजे. मनाला शिक्षण देणे याचे नाव अभ्यास करणे. मनाची विश्रांती हीच खरी विश्रांती होय. सृष्टीमध्ये सर्व ठिकाणी वैचित्र्य आढळते. प्राण्यांच्या कितीतरी जाती आहेत. माणसेसुद्धा एकासारखी एक कुठे असतात ? पण सर्वांमध्ये भगवंत मात्र सारखाच ओवलेला आहे. जगामध्ये प्राणी एकमेकाला मारक असूनदेखील कसे जगतात, हे पाहिले म्हणजे आश्चर्य वाटते. जगामध्ये माणूस आणि वाघ दोघेही राहतात. परंतु दोघांनाही एकमेकांची भिती असते, म्हणून एक दुसर्याला सहसा मारीत नाही. ज्याच्यामुळे दुसर्याच्या हिताचा घात होतो, अशी कृती करणे म्हणजे हिंसेचे लक्षण समजावे. भगवंताच्या आड येणार्या वस्तूंची हिंसा करणे ही अहिंसाच होय. पण आपल्या स्वार्थाकरिता आणि बडेजावाकरिता लोकांचे मन दुखविणे, ही हिंसाच समजावी. दुसर्याचे मन दुखविणे म्हणजे भगवंताचे मन दुखविणे होय. आपल्या मनात आलेली गोष्ट आपल्या हातूनसुद्धा होत नाही, तर मग इतरांनी आपल्या मनासारखे वागावे असे म्हणणे हे काही बरोबर नाही. आपल्याकडे बायका चातुर्मासामध्ये नियम करतात. उदाहरणार्थ, रोज एक वात लावायची, उजव्या हाताने पाणी प्यायचे, वगैरे. वास्तविक हे नियम कसले ! तुम्ही एक वात लावली काय आणि दोन वाती लावल्या काय, शेवटी दिवा लावावा लागतोच ! त्यापेक्षा, ' कुणाचे अंतःकरण दुखविणार नाही' असा नियम करावा. प्रथम चार महिने करावा आणि मग वर्षभर पाळावा आणि नंतर जन्मभर ठेवावा. काही बायका चातुर्मासात मीठ सोडतात. असे अळणी खाणारी बाई जेवायला बसली असताना मीठ वाढायला आलेल्या बाईला दुरूनच ' नको नको ' म्हणते; कारण न जाणो, चुकून मीठ किंवा मिठाचा पदार्थ पानात पडायचा ! हे जसे ती सांभाळते, त्याचप्रमाणे आपण कुणाचे अंतःकरण न दुखविण्याचा नियम केला की, आपण किती बेताने बोलू आणि कोणी आले तर आपण किती काळजीपूर्वक वागू ! भगवंत चोहोकडे आहे असे आपण म्हणतो, पण त्याप्रमाणे वागत नाही, याला काय करावे ? भगवंताचे होऊन त्याच्या नामात राहणे हाच एक उत्तम मार्ग आहे.आजचे बोधवचन आहे : अंतःकरण न दुखवता बोलणे, हे वाचेचे तप आहे असे म्हणतात.

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

# अध्यात्म आणि विज्ञान

आधुनिक केसरी

अध्यात्म आणि विज्ञान यांचे परस्परांशी संबंध काय आहेत ? या प्रश्नाला अनेक उत्तरे दिली गेली आहेत. एक उत्तर आहे : ती मूलतःच परस्परविरुद्ध आहेत; दुसरे उत्तर आहेः ती स्वतंत्र आहेत, आणि म्हणून त्यांच्यात कसलाही संबंध नाही; आणि तिसरे आहेः ती स्वतंत्र आहेत, पण ती परस्परपूरक आहेत. या उत्तरांपैकी बरोबर उत्तर कोणते ? पण या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी अध्यात्म म्हणजे काय आणि विज्ञान म्हणजे काय हे पाहिले पाहिजे. अध्यात्म आणि विज्ञान यांपैकी विज्ञान म्हणजे काय या प्रश्नाचे उत्तर बरेच निश्चित आहे, आणि म्हणून ते देणे सोपे आहे. परंतु अध्यात्म म्हणजे काय हे सांगणे मात्र बरेच कठीण आहे. 'विज्ञान' हे एका अतिशय विशाल अशा ज्ञानसंग्रहाचे नाव आहे. हे ज्ञान मानवाला प्राप्य असणारे सर्वांत विश्वसनीय असे ज्ञान आहे. ते ज्ञान मिळविण्याची विज्ञानाची एक विशिष्ट पद्धत आहे, आणि त्या ज्ञानाची मांडणीही एका विशिष्ट पद्धतीने केली जाते. विज्ञानाची ज्ञान मिळविण्याची पद्धत म्हणजे जिला वैज्ञानिक पद्धती म्हणतात ती. ही पद्धत इंद्रियानुभवानुसारी असून तिच्यात इंद्रियानुभव हा ज्ञानाचा अंतिम निकष मानला जातो. या पद्धतीत इंद्रियांनी मिळणाऱ्या एकवचनी विशिष्ट माहितीवरून सामान्य किंवा सार्विक विधानांची प्रस्थापना केली जाते. आणि त्या विधानांची मांडणी जिला व्यवस्थित म्हणतात त्या पद्धतीने केली जाते. व्यवस्थित म्हणजे अशी की जिच्यात काही मोजक्या विधानांवरून अन्य सर्व विधाने निष्पन्न होतात; म्हणजे ती मोजकी विधाने खरी असतील तर त्यावरून निष्पन्न होणारी विधाने खोटी असू शकत नाहीत. विश्वाचे ज्ञान मिळविण्याचे वैज्ञानिक पद्धतीहून अन्य साधन मानवाजवळ नाही असा विज्ञानाचा दावा आहे. आता 'अध्यात्म म्हणजे आत्म्याविषयी. आत्मविषयक, अध्यात्म म्हणजे आत्मविचार. विज्ञान जर जगाचे, विश्वाचे ज्ञान मिळवावयास निघाले असेल, तर अध्यात्म आत्म्याविषयीचे ज्ञान मिळविण्याकरिता निघालेले असते. म्हणजे या दोन अभ्यासांचे विषय भिन्न आहेत. विश्वाचे ज्ञान ज्याला होते त्या ज्ञात्याचा, आत्म्याचा विचार विज्ञान करीत नाही. पण त्याचाही विचार करावा लागतोच. तो विचार म्हणजे अध्यात्म. आता आत्म्याचा अभ्यास विज्ञानात केला जात नाही हे म्हणणे पूर्णपणे खरे नव्हे. कारण विश्वात आपल्या आत्म्यांचाही समावेश होतो, आणि म्हणून विश्वाच्या ज्ञानात आत्मज्ञानाचाही समावेश होतो. परंतु विज्ञानाच्या कार्यपद्धतीनुसार त्यात आत्म्याच्या **क्रमशः**

दि. य. देशपांडे

# कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना महाराष्ट्र असा - तसा वाटला का ?

## अजित पवार : महाराष्ट्र अशी वक्तव्ये कदापि खपवून घेणार नाही

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** तुम्ही महाराष्ट्र मागायला निघालात का? कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना महाराष्ट्र असा- तसा वाटला का? असा रोखठोक आणि संतप्त सवाल राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसची आज प्रदेश कार्यालयात आदरणीय शरद पवार यांच्या उपस्थितीत बैठक होत असून या बैठकीला आले असता अजित पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

सांगली जिल्हयातील जत तालुक्यातील गावांवर दावा केल्यानंतर आता अक्कलकोटवरही कर्नाटक मुख्यमंत्र्यांनी दावा केला त्यावर बोलताना अजित पवार यांनी कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना खडेबोल सुनावले.

कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांनी अशी वक्तव्य करणे ताबडतोब थांबवावे. त्यांचे हे वक्तव्य निंदनीय असून त्यांचा अजित पवार यांनी निषेध केला. लोकांचे लक्ष महागाई आणि बेरोजगारीवरुन हटवण्यासाठी अशी वक्तव्य केली जात आहेत. सध्या कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांच्या अंगात काय संचारले आहे काय माहित. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी कडक शब्दात त्यांना सुनावले पाहिजे. आता फक्त मुंबई मागणे बाकी ठेवले आहे असा उपरोधिक टोलाही अजित पवार यांनी यावेळी लगावला. केंद्राने यामध्ये तात्काळ हस्तक्षेप करावा. महाराष्ट्र अशी वक्तव्ये कदापि खपवून घेणार नाही असा इशाराही अजित पवार यांनी दिला.

प्रत्येक राज्याचा अस्मितेचा प्रश्न असतो. अनेक मुख्यमंत्र्यांनी राज्याला एकसंघ ठेवण्याचा काम केले आहे. आता काहीही कारण नसताना कर्नाटकचे मुख्यमंत्री बोलले आहेत त्यामुळे महाराष्ट्र सरकारने आपली भूमिका मांडली पाहिजे असेही अजित पवार म्हणाले. आम्ही शिर्डी येथे गेलो. पंढरपूर येथे गेलो तर दर्शन घेतो. आपली ती परंपरा आहे. तिथपर्यंत समजू शकतो मात्र ज्योतिषाकडे जाऊन आपले भविष्य बघणे कितपत योग्य आहे. २१ व्या शतकात जग कुठे चालले आहे. बदल होत असताना सायन्स काय सांगत आहे. पुरोगामी राज्याचे मुख्यमंत्री ज्योतिष बघतात... काय बोलावं आम्ही हतबल झालो ऐकून अशा शब्दात अजित पवार यांनी आपली नाराजी व्यक्त केली.



# स्टार एअरचे नाशिक-बेळगाव विमानसेवेचे बुकिंग पुन्हा सुरू

## छगन भुजबळ यांच्या प्रयत्नांना यश

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** स्टार एअरने नाशिक-बेळगाव विमानसेवेचे बुकिंग पुन्हा सुरू केले असून दि.३ फेब्रुवारी २०२३ पासून नाशिक स्टार एअरची नाशिक-बेळगाव विमानसेवा होणार सुरू होणार आहे. माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी उड्डाण योजने अंतर्गत विमानसेवा पुन्हा सुरू करण्याची मागणी केल्यानंतर केंद्रीय नागरी उड्डायन मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्या निर्देशानुसार, स्टार एअरने बेळगाव-नाशिक-बेळगाव विमानसेवेसाठी बुकिंग पुन्हा सुरू केली असल्याची माहिती उद्योजक मनीष रावल यांनी दिली आहे.

छगन भुजबळ यांनी नुकतीच केंद्रीय नागरी उड्डायन मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्याकडे नाशिक विमानतळावरून उड्डाण योजनेला पुन्हा मुदतवाढ देऊन विमानसेवा सुरू करण्याची मागणी केली होती. या मागणीला यश आले असून दि. ३ फेब्रुवारी २०२३ पासून स्टार एअरलाइन प्रत्येक शुक्रवार आणि रविवारी नाशिक बेळगाव विमानसेवा सुरू करणार आहे. त्यासाठी त्यांनी बुकिंग देखील सुरू केली आहे. तसेच दुसऱ्या कंपन्यांच्या देखील विमानसेवा सुरू करण्यासाठी छगन भुजबळ यांचे प्रयत्न सुरू आहेत.

त्यानुसार एस ५, १४५ ही फ्लाइट बेळगावहून शुक्रवारी सकाळी ९.३० वाजता निघेल नाशिक येथे १०.३० पोहचेल तर रविवारी सायंकाळी ५.०५ वाजता सुटेल आणि सायंकाळी ६.०५ वाजता नाशिकला पोहोचेल. तर एस ५, १४६ ही फ्लाइट नाशिकहून शुक्रवारी सकाळी १०.४५ वाजता निघेल ११.४५ ला बेळगाव येथे पोहचेल. रविवारी सायंकाळी ६.३० वाजता निघेल आणि सायंकाळी ७.३० वाजता बेळगावला पोहचेल. या मार्गावर ५० सीटर एम्ब्रेअर १४५ विमाने धावणार आहेत.

# महाविकास आघाडीने महाराष्ट्राला बदनाम करण्याची सुपारी घेतली का

## भाजपा मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांचा सवाल

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातून उद्योग बाहेर गेल्याची आवई उठवल्यानंतर आता ४४ खेडी कर्नाटकला दिली जाणार असल्याच्या धादांत खोट्या बातम्या पसरवणाऱ्या काँग्रेस, राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने महाराष्ट्राला बदनाम करण्याची सुपारी घेतली आहे का असा खडा सवाल भारतीय जनता पार्टीचे प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी गुरुवारी उपस्थित केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. काँग्रेस पक्षाच्या तत्कालीन नेतृत्वाच्या नाकर्तेपणामुळेच बेळगाव महाराष्ट्रात येऊ शकले नाही, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी उपाध्ये यांनी बेळगाव, कारवार, निपाणी हा भाग महाराष्ट्रात सामील करावा यासाठी लढा देणाऱ्या महाराष्ट्र एकीकरण समितीचे नेतृत्व केलेल्या ज्येष्ठ समाजवादी नेते एस. एम. जोशी यांच्या मी एस.एम. या आत्मचरित्रातील सीमा लढ्याविषयीच्या प्रकरणाचा उल्लेख केला. उपाध्ये म्हणाले की, आपल्या आत्मचरित्रात एस.एम. जोशी यांनी काँग्रेस पक्षाच्या तत्कालीन केंद्रीय आणि राज्य नेतृत्वाच्या नाकर्तेपणामुळे सीमा प्रश्न सुटला नाही असे अनेक उदाहरणे देऊन दाखवून दिले आहे. एकही खेडं कर्नाटकला दिले जाणार नाही, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. तरीही महाविकास आघाडीचे नेते कर्नाटक महाराष्ट्राची खेडी पाठविणार असल्याचा अपप्रचार करीत आहेत.

काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रातून गुजरातला उद्योग पळवले जात असल्याचा खोटा प्रचार महाविकास आघाडीने केला होता. मात्र हा खोटेपणा तत्काळ उघडा पडला. आता कर्नाटक महाराष्ट्राची खेडी पळवणार असल्याची आवई उठवली जात आहे. या घटनांतून महाविकास आघाडीने महाराष्ट्राला बदनाम करण्याची सुपारीच घेतली आहे असे दिसते आहे. या या विषयावर राजकारण करून महाविकास आघाडीने आपला संकुचितपणाच दाखवून दिला आहे, असेही उपाध्ये म्हणाले.

# नागपुरात 49 वर्षांनंतर प्रथमच 'इंडियन सायन्स काँग्रेस'

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** संत्रानगरीत अर्थात नागपुरात 1974 नंतर प्रथमच भारतीय विज्ञान परिषदेचे (इंडियन सायन्स काँग्रेस) आयोजन करण्यात आले आहे. 108 व्या इंडियन सायन्स काँग्रेसचे यजमानपद राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाला मिळाले आहे. 3 ते 7 जानेवारी दरम्यान विद्यापीठ परिसरात आयोजित या परिषदेचे उद्‌घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली परिषदेच्या आयोजनासंदर्भात आढावा घेण्यात आला. दरवर्षी भारतातील प्रमुख शहरामध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे या परिषदेचे आयोजन केले जाते. कृषी, वने, प्राणी, मत्स्य, पशुशास्त्र, अभियांत्रिकी, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र पर्यावरण माहिती तंत्रज्ञान, पदार्थ विज्ञान, सांख्यिकी, वैद्यकीय विज्ञान, नवीन जीवशास्त्र, अशा 14 विविध विभागांवर नवनवीन शोध प्रबंध, भव्य प्रदर्शनी, मार्गदर्शन आणि यामध्ये तज्ञांचा सहभाग, अशी विज्ञानाला समर्पित व्यापकता या संमेलनाची असते. यापूर्वी 1974 मध्ये नागपुरात 61 वी सायन्स काँग्रेस झाली होती. जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावरील अनेक मान्यवर शास्त्रज्ञ, संशोधक या काळात नागपूर शहरात असतील. याशिवाय गेल्या काळात महत्वपूर्ण संशोधन करणाऱ्या प्रमुख संस्था या ठिकाणी प्रदर्शनात सहभागी होणार आहेत. देश विदेशातील वैज्ञानिकांचा समावेश आणि त्यांच्यासोबत विज्ञानात प्रगती असणाऱ्या विद्यार्थ्यांचा संवादही या संमेलनाचे वैशिष्ट्य आहे. या संमेलनामध्येच राष्ट्रीय किशोर विज्ञान संमेलन देखील घेण्यात येते. यासाठी किशोर वैज्ञानिकही नागपुरात मुक्कामी असतील. राष्ट्रीय स्तरावरील या संमेलनाच्या आयोजनाबाबत आज झालेल्या बैठकीला नागपूर जिल्हा प्रशासन, नागपूर महानगरपालिका, पोलीस प्रशासन, नागपूर विद्यापीठ आणि अन्य प्रमुख संस्थांचे विभाग प्रमुख उपस्थित होते. आढावा बैठकीत विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी प्रसन्ना बिदरी, यांच्यासह नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु एस. आर. चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महानगरपालिका आयुक्त राधाकृष्णन बी, उपायुक्त आशा पठाण, प्रदीप कुलकर्णी महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त राम जोशी, पोलीस उपायुक्त एम. सुदर्शन, निरीच्या मुख्य संशोधक पद्मा राव, निरीच्या विज्ञान सचिव डॉ. रिटा दोदाफकर, मनपाचे अभियंता वाईकर, विज्ञान परिषदेचे स्थानिक सचिव जी. एस. खांडेकर, राजेश सिंग उपस्थित होते.

# गुजरातमध्ये भाजप, काँग्रेससमोर 'आप'चं आव्हान

आधुनिक केसरी न्यूज

**दिल्ली :** गुजरातमध्ये विधानसभा निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. गुजरातवर सत्ता मिळवण्यासाठी सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे. यंदा गुजरात निवडणुकीत मुख्य लढत भाजप, काँग्रेस आणि आम आदमी पार्टी यांच्यात असल्याचे पाहायला मिळते. आप, भाजप, काँग्रेससह सर्वच राजकीय पक्षांचे नेते जाहीर सभा आणि रॅलींद्वारे जनतेला आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत. दरम्यान, माध्यमांकडून निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जनतेचा कौल जाणून घेण्यासाठी वेगवेगळे सर्वेक्षण करत आहेत. अशातच एका सर्वेक्षणामधून धक्कादायक निष्कर्ष समोर आला आहे.

दिल्ली, पंजाब यानंतर आता आम आदमी पार्टीचे लक्ष्य गुजरातवर आहे. राज्यात पहिल्यांदाच निवडणूक लढवणारा आम आदमी पक्ष किती जागा जिंकणार, असा प्रश्न सर्वांच्याच मनात आहे. आप गुजरातमधील सर्व जागांवर निवडणूक लढवणार आहे. यासंदर्भात गुजरातच्या जनतेचा कौल जाणून घेण्यासाठी एक सर्वेक्षण पार पडले. रिपब्लिक इंडिया आणि च्या ओपिनियन पोलमध्ये पहिल्यांदाच आम आदमी पार्टी विधानसभेच्या सर्व जागांवर किती जागा लढवेल, असा अंदाज वर्तवण्यात आला.

# मध्य प्रदेशातील 'भारत जोडो' यात्रेत प्रियांका गांधी सहभागी

आधुनिक केसरी न्यूज

**बुऱ्हानपूर :** काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील 'भारत जोडो' यात्रेचा सध्या मध्य प्रदेशातून प्रवास सुरू आहे. या यात्रेत काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी-वाड्रादेखील सहभागी झाल्या आहेत. गांधी बहिण-भावांचा फोटो काँग्रेसने ट्विटरवर शेअर केला आहे. जेव्हा आम्ही एकत्र चालू तेव्हा आमची पावले आणखी मजबूत होतील असे कॅप्शन या पोस्टला हिंदीत देण्यात आले आहे. मध्य प्रदेशातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते कमलनाथ आणि दिग्विजय सिंहदेखील या यात्रेत सहभागी झाले आहेत. खंडवाच्या बोरगावातून आज सकाळी ही यात्रा सुरू झाली आहे. खरगोनला जाण्यापूर्वी काँग्रेसजण स्वातंत्र्यसैनिक आणि आदिवासींचे नेते टंट्या भिल यांच्या जन्मस्थळाला भेट देणार आहेत. आदिवासी क्षेत्रात प्रभाव निर्माण करण्याच्या काँग्रेसच्या प्रयत्नांना सत्ताधारी भाजपाने 'जनजातीय गौरव' यात्रेने प्रत्युत्तर दिले आहे. टंट्या भिल यांच्या जन्मस्थळापासून बुधवारी या यात्रेला सुरुवात झाली आहे. या यात्रेच्या पहिल्या दिवशी मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान आणि चार मंत्र्यांनी सहभाग घेतला होता.

दरम्यान, बुधवारी बुऱ्हानपूर येथील सभेत राहुल गांधींनी मध्य प्रदेशातील सत्ताधारी भाजपावर सडकून टीका केली आहे. "आम्ही मध्य प्रदेशात निवडणूक जिंकलो होतो. तेथे आमचं सरकार होतं. मात्र, त्यांनी (भाजपा) २० ते २५ भ्रष्टाचारी आमदारांना कोट्यावधी रुपये देत खरेदी केले आणि सरकार स्थापन केले, असा आरोप गांधी यांनी केला आहे. सर्व लोकशाही मार्ग बंद झाल्याने आम्ही 'भारत जोडो' यात्रा सुरू केली आहे. लोकसभा, निवडणुकीचा मार्ग, माध्यमं सर्व बंद आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजपाने या सर्व संस्थांना वेठीस धरले आहे. न्यायव्यवस्था, न्यायालये दबावात आहे, असेही राहुल गांधींनी म्हटल आहे.



# बिसलरीची विक्री

आधुनिक केसरी

भारताची सर्वात मोठी 'पॅकेज वॉटर कंपनी' 'बिसलरी'ची विक्री होणार आहे. सॉफ्ट ड्रिंक ब्रँड थम्स अप, गोल्ड स्पॉट आणि लिम्का आंतरराष्ट्रीय कोका-कोला कंपनीला विकल्यानंतर ३० वर्षांनी आता कंपनीचे चेअरमन रमेश चौहान यांनी या नव्या निर्णयाची माहिती दिली. मागील दोन वर्षांपासून बिसलरी कंपनीच्या विक्रीबाबत चर्चा सुरू होती. बिसलरी कंपनी विकत घेण्यासाठी अनेक कंपन्या उत्सुक आहेत. काही वृत्तपत्रांनी टाटा कंज्यूमर प्रोडक्ट्स लिमिटेडने बिसलरी कंपनी ७,००० कोटी रुपयांना खरेदी केल्याचे वृत्त दिले. मात्र, चौहान यांनी हे वृत्त फेटाळले आहे. माध्यमांमधील वृत्तानुसार, या व्यवहाराबाबत टाटा समुह आणि बिसलेरीच्या व्यवस्थापनाची मागील दोन वर्षांपासून चर्चा सुरू आहे. यानंतर लवकरच या निर्णयावर शिक्कामोर्तब होऊ शकतो. ८२ वर्षाच्या रमेश चौहान यांची प्रकृती मागील काही दिवसांपासून चांगली नाही. चौहान यांनी म्हटले आहे की, बिसलेरीच्या विस्ताराच्या पुढील टप्प्यासाठी त्यांच्याकडे वारसदार नाही. त्यांची मुलगी जयंतीला या व्यवसायात रस नाही. काही वृत्तपत्रांनी दिलेल्या वृत्तानुसार, चौहान म्हणाले, "मला टाटा समुहावर विश्वास आहे. टाटा समूह बिसलरीला आणखी पुढे घेऊन जाईल. मी अशा लोकांच्या शोधात होतो जे बिसलरीची काळजी घेतली. मी आणि कर्मचाऱ्यांनी बिसलरी कंपनीचा व्यवसाय खूप तन्मयतेने केला आहे. सीईओ एंजेलो जॉर्ज यांच्या अध्यक्षतेखालील टीमला दैनंदिन व्यवस्थापनाची जबाबदारी देण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०२३ मध्ये बिसलरीचा व्यवसाय २२० कोटी रुपयांच्या नफ्यासह २,५०० कोटी रुपयांचा टप्पा गाठेल असा अंदाज आहे. बिसलरी हा मुळात इटालियन ब्रँड होता. त्यांनी भारतात १९६५ मध्ये मुंबईत स्थापना केली होती. चौहान यांनी १९६९ मध्ये बिसलरीची मालकी घेतली. बिसलरी कंपनीचे एकूण १२२ ऑपरेशनल प्लँट आहेत आणि भारतासह शेजारी देशांमध्ये एकूण ४,५०० वितरक आहेत. वितरणासाठी कंपनीकडे एकूण ५,००० ट्रकचे नेटवर्क आहे.




# पुरुषही अत्याचाराला बळी पडतात !



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**पुरुष अत्याचाराला बळी पडतात पण तुमचा विश्वास बसणार नाही..पण हे खरय.एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आता केवळ महिलाच नाही तर पुरुषही सुरक्षित नाहीत. जालंदरमध्ये ४ मुलींनी एका तरुणाचे अपहरण करून त्याच्यावर बलात्कार केला आणि नंतर त्याला सोडून दिले. ही घटना लेदर कॉम्प्लेक्स रोडची आहे. पीडित मुलगी एका कारखान्यात काम करून घरी परतत होती. पीडित  दुपारी कामावरून घरी जात होता. यादरम्यान एक कार रस्त्यावर येऊन थांबली. गाडीत बसलेल्या चार मुली तिचा पत्ता विचारू लागल्या. तो पत्ता सांगत होता की काही वेळातच मुलींनी त्याला काहीतरी वास आल्याने बेशुद्ध केले आणि त्याचे अपहरण केले.**

यानंतर कारमध्येच एकामागून एक ४ मुलींनी जबरदस्तीने संबंध ठेवल्याचा आरोप तरुणाने केला आहे. चार मुलींचे वय २२ ते २३ वर्षांच्या दरम्यान असल्याचे तरुणाने सांगितले. सद्यस्थितीत याप्रकरणी पोलिसात तक्रार देण्यात आलेली नाही. चर्चेचा बाजार चांगलाच तापला असताना आता पुरुषही सुरक्षित नाहीत, असे लोक बोलताना दिसतात. एका पुरुषावर अत्याचार झाला, कोणीही विश्वास ठेवत नाही- आपण त्या समाजाचा एक भाग आहोत जिथे एखादा माणूस म्हटला की त्याच्यावर जबरदस्ती केली गेली, तर सगळे हसतात आणि त्याच्यावर विश्वास ठेवण्यास स्पष्टपणे नकार देतात. जर एखादा पुरुष स्त्रीच्या घाणेरड्या नजरेचा बळी ठरला तर त्यात त्याचा काय दोष आणि लोक त्याचे का ऐकत नाहीत. , हा मोठा प्रश्न वर्षानुवर्षे भेडसावत आहे. २०१७ मधील एक प्रकरण आहे ज्यात एका पुरुषाला तीन महिलांनी कैद केले, त्यानंतर ३० दिवस तिच्यावर बलात्कार केला. दुसरीकडे, हे प्रकरण समोर आल्यावर कोणीही काही बोलले नाही, कोणी ऐकले नाही. असेच एक प्रकरण रशियातून समोर आले आहे. येथे एका महिलेने १० पुरुषांना आपल्या घाणेरड्या नजरेचा बळी बनवले होते. त्याच वेळी, २०१५ सालचे एक प्रकरण आहे जे अमेरिकेचे आहे. येथे एका गर्भवती महिलेवर नराधमाने बलात्कार केला. या सर्व बाबी आहेत, ज्यावर एकतर कोणीही विश्वास ठेवला नाही किंवा ते असेच राहिले. ही माणसे अशी आहेत ज्यांच्यासाठी ना सोशल मीडियावर ट्रेंड झाला, ना त्यांच्या हक्कांबद्दल बोलले गेले, ना त्यांच्यासाठी कोणी रस्त्यावर आले. बदला घेण्यासाठी पुरुषांवर केले जातात आरोप- अशी अनेक प्रकरणे समोर येतात ज्यात बदला घेण्यासाठी महिला पुरुषांवर खोटे आरोप करतात आणि ते आरोप असेच नसून बलात्काराचे आहेत जे महिलांनी १००० वेळा विचार करायला हवेत. एवढा घृणास्पद आरोप एक महिला कोणावर तरी कशी काय करू शकते? २०१८ सालचे एक प्रकरण आहे जे दिल्लीचे आहे. येथे एका महिलेने पुरुषाच्या नावावर भाड्याने खोली घेतली आणि जेव्हा त्या व्यक्तीला याची माहिती मिळाली तेव्हा महिलेने त्याच्यावर बलात्काराचा खोटा आरोप केला. हा मुद्दा कोर्टात गेला आणि तिथे सर्व काही मिटले. हा मुद्दा समोर आल्यानंतर अनेकांचा यावर विश्वास बसला नाही आणि ते यावर विश्वास कसा ठेवणार कारण हा मुद्दा पुरुषाचा आहे. २०१४ मध्ये आणखी एक प्रकरण समोर आले होते ते दिल्लीतीलच होते. या प्रकरणात एका सुनेने सासरच्या लोकांवर बलात्काराचा खोटा आरोप केला होता, तोही केवळ सासरा तिच्या नावावर मालमत्ता हस्तांतरित करत नसल्याने. तसंच जगभरात अशा अनेक बलात्काराच्या घटना आहेत ज्या खोट्या आहेत आणि कोणत्या ना कोणत्या गोष्टीचा बदला घेण्यासाठी लावल्या जातात. एका अहवालानुसार, देशभरातील न्यायालयांमधील 76 टक्के बलात्काराच्या केसेस खोट्या आहेत. आता तुम्ही विचार करा की अशी प्रकरणे समोर आल्यावर समाज का झोपतो...?  जगभरात असे अनेक पुरुष आहेत जे छळाचे बळी आहेत पण फरक एवढाच आहे की त्यांच्यासाठी कोणीही लढत नाही. रस्त्यात बाईने पुरुषाला मारले तर लोक म्हणतात- 'चांगले मार', 'मुलाने काहीतरी वाईट केले असेल'. त्याच वेळी, काहीवेळा लोक स्वतः मुलाला मारहाण करतात. त्याचप्रमाणे एखाद्या पुरुषाने एखाद्या महिलेला रस्त्यात मारले तर लोक त्या महिलेच्या समर्थनार्थ उभे राहतात आणि तिला वाचवायला जातात. या प्रकरणातही पुरुष वाईट निघतो. एखाद्या स्त्रीने एखाद्या पुरुषावर खोटा आरोप केला तरी लोक त्या स्त्रीला न्याय मिळवून देण्यासाठी बोलतात, हॅशटॅग चालवतात, ट्रेंड चालवतात, मेणबत्ती मार्च काढतात, घोषणाबाजी करतात, मोठमोठे बोलतात आणि सगळ्यात मोठी गोष्ट म्हणजे यात राजकारण्यांपासून ते राजकारण्यांपर्यंत. बॉलीवूड सेलिब्रिटी येतात आणि न्याय मागतात. दुसरीकडे, त्याच स्त्रीऐवजी पुरुष असेल तर त्याला म्हणतात-' तू खोटं का बोलत आहेस', 'हा माणूस खोटारडा आहे', 'तू माणूस आहेस, तुझ्यासोबत असं होऊ शकत नाही', 'तुम्ही काहीतरी केलं असेल आणि इतरांना दोष देत असेल'. अशा अनेक आरोपांना पुरुषांना सामोरे जावे लागते. माणूस कधीच रडू शकत नाही कारण तो माणूस आहे. माणूस त्याच्या वेदना सांगू शकत नाही कारण तो माणूस आहे. पुरुष कधीही स्त्रीवर घृणास्पद आरोप करू शकत नाही कारण तो पुरुष आहे. आपण कोणत्या जगात राहतोय, हा कसला समाज आहे, ही कसली माणसं आहेत, काय चाललंय...? लोकांच्या मानसिकतेला दाद द्यावी लागेल, एकीकडे ते म्हणतात की स्त्री-पुरुष समान आहेत आणि दुसरीकडे स्त्रिया जेव्हा त्यांच्या वेदना सांगतात तेव्हा त्या विरघळतात आणि पुरुष त्यांच्या वेदना सांगतात तेव्हा ते कठोर होतात. कधी कधी असं वाटतं की माणूस असणं हा गुन्हा आहे... तुम्ही काहीतरी केले असेल आणि इतरांना दोष देत आहात. अशा अनेक आरोपांना पुरुषांना सामोरे जावे लागते. माणूस कधीच रडू शकत नाही कारण तो माणूस आहे. माणूस त्याच्या वेदना सांगू शकत नाही कारण तो माणूस आहे. पुरुष कधीही स्त्रीवर घृणास्पद आरोप करू शकत नाही कारण तो पुरुष आहे. आपण कोणत्या जगात राहतोय, हा कसला समाज आहे, ही कसली माणसं आहेत, काय चाललंय...? लोकांच्या मानसिकतेला दाद द्यावी लागेल, एकीकडे ते म्हणतात की स्त्री-पुरुष समान आहेत आणि दुसरीकडे स्त्रिया जेव्हा त्यांच्या वेदना सांगतात तेव्हा त्या विरघळतात आणि पुरुष त्यांच्या वेदना सांगतात तेव्हा ते कठोर होतात. कधी कधी असं वाटतं की माणूस असणं हा गुन्हा आहे... तुम्ही काहीतरी केले असेल आणि इतरांना दोष देत आहात. अशा अनेक आरोपांना पुरुषांना सामोरे जावे लागते. माणूस कधीच रडू शकत नाही कारण तो माणूस आहे. माणूस त्याच्या वेदना सांगू शकत नाही कारण तो माणूस आहे. पुरुष कधीही स्त्रीवर घृणास्पद आरोप करू शकत नाही कारण तो पुरुष आहे. आपण कोणत्या जगात राहतोय, हा कसला समाज आहे, ही कसली माणसं आहेत, काय चाललंय...? लोकांच्या मानसिकतेला दाद द्यावी लागेल, एकीकडे ते म्हणतात की स्त्री-पुरुष समान आहेत आणि दुसरीकडे स्त्रिया जेव्हा त्यांच्या वेदना सांगतात तेव्हा त्या विरघळतात आणि पुरुष त्यांच्या वेदना सांगतात तेव्हा ते कठोर होतात. कधी कधी असं वाटतं की माणूस असणं हा गुन्हा आहे... , आपण कोणत्या जगात राहतोय, हा कसला समाज आहे, ही कसली माणसं आहेत, काय चाललंय...? लोकांच्या मानसिकतेला दाद द्यावी लागेल, एकीकडे ते म्हणतात की स्त्री-पुरुष समान आहेत आणि दुसरीकडे स्त्रिया जेव्हा त्यांच्या वेदना सांगतात तेव्हा बन त्या विरघळतात आणि पुरुष त्यांच्या वेदना सांगतात तेव्हा ते कठोर होतात. कधी कधी असं वाटतं की माणूस असणं हा गुन्हा आहे... , आपण कोणत्या जगात राहतोय, हा कसला समाज आहे, ही कसली माणसं आहेत, काय चाललंय...? लोकांच्या मानसिकतेला दाद द्यावी लागेल, एकीकडे ते म्हणतात की स्त्री-पुरुष समान आहेत आणि दुसरीकडे स्त्रिया जेव्हा त्यांच्या वेदना सांगतात तेव्हा त्या विरघळतात आणि पुरुष त्यांच्या वेदना सांगतात तेव्हा ते कठोर होतात. कधी कधी असं वाटतं की माणूस असणं हा गुन्हा आहे... समाजाचा दृष्टीकोन बदलला पाहिजे- समाजात महिलांसाठी जशी पावले उचलली जातात, तशीच पावले पुरुषांसाठीही उचलली गेली पाहिजेत. पुरुषांबद्दलही सहानुभूती असली पाहिजे कारण ती आवश्यक आहे. ज्या प्रकारे समाज महिलांच्या हक्कांसाठी लढतो, त्याचप्रमाणे पुरुषांच्या हक्कांबद्दल बोललो तर काही प्रमाणात पुरुषही त्यांच्या समस्या उघडपणे मांडू शकतील आणि छळ होण्यापासून वाचतील. ही समाजाची वृत्ती आहे जी माणसाला आपल्यावर होत असलेल्या अत्याचारांना सांगण्यापासून रोखते कारण समाज त्याकडे दुर्लक्ष करतो किंवा नाकारतो. दुसरीकडे, एक स्त्री उघडपणे आपला मुद्दा ठेवते कारण समाज तिला पटकन स्वीकारतो. या सगळ्या गोष्टींचा विचार करताना मनात अनेक प्रश्न उभे राहतात जसे की, समाज पुरुषांना त्यांच्यासोबत झालेल्या गैरवर्तनाबद्दल सांगण्याची संधी कधी देईल, पुरुषांचे म्हणणे कधी समजेल, पुरुषांसोबत होणारी छेडछाड कधी म्हणून घेतली जाणार नाही. विनोद. जाईल, त्यांची चेष्टा कधी होणार नाही, समाज कधी सुधरणार.. , एखाद्या मुलीला न्याय मिळवून देण्यासाठी जगभरातील लोक ज्या प्रकारे कोणत्याही थराला जातात, त्याचप्रमाणे पुरुषांच्या वेदना समजून घेऊन त्यांनाही न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष केला तर खऱ्या अर्थाने मुलगा आणि मुलगी समान असतील.

# पदवी शिक्षणातील स्वागतार्ह बदल



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**नव्या शैक्षणिक धोरणाचा भाग म्हणून पदवी अभ्यासक्रम तीन वर्षा ऐवजी चार वर्षाचा झाला आहे.या आधीचे बारावी पर्यंत चे विभाग देखील काही प्रमाणात बदलले आहेत.पदवीचे शिक्षण हे क्रेडिट पद्धतीचे असून त्यात कोर्स, विषय निवडीचे स्वातंत्र्य असेल.शिवाय काही क्रेडिट कमावल्या नंतर गॅप घेऊन नोकरी चा अनुभव घेता येईल.एवढेच नव्हे तर नोकरी करता करता देखील शिकता येईल.म्हणजे शिक्षणाच्या खर्चाचा भार पालकांवर न पडता मुले स्वावलंबी व्हायला शिकतील. नव्या शैक्षणिक धोरणात आंतर शाखीय अभ्यासावर भर देण्यात आलाय.  म्हणजे विज्ञान विषयाचे मेजर क्रेडिट घेऊन सोबत संगणक,कॉमर्स,व्यवस्थापन,आर्ट्स, या शाखेचे आवडीचे विषय निवडण्याचे स्वातंत्र्य राहील. यामुळे शिक्षण,ज्ञान एकांगी न राहता,वेगवेगळे विषय अभ्यासता येतील.**

ही काळाची,भविष्याची गरज आहे.चार वर्षाचा पदवी अभ्यासक्रम केला की पदव्युत्तर अभ्यास न करता देखील चांगल्या नोकऱ्या मिळू शकतील.आर्थिक निकड म्हणून,घरची परिस्थिती म्हणून अनेकांना लवकर आर्थिक स्थैर्य हवे असते. अशा बहुसंख्य मुलासाठी हा चार वर्षाचा पदवी अभ्यासक्रम निश्चित फायद्याचा ठरेल. यातही काही कालावधी नंतर अधिक क्रेडिट कमावत पदव्युत्तर शिक्षण घेण्याची सोय आहेच. आपल्या परंपरागत शिक्षण पद्धतीत भिंती बांधून एका विषयाला दुसऱ्या विषया पासून दूर ठेवले जाई.आता नव्या पद्धतीत पूल बांधण्यावर भर आहे.निवडीत लवचिकता आहे.हे तरुण पिढीसाठी फायद्याचेच आहे.पण त्यासाठी विद्यार्थ्यांना स्वावलंबी व्हावे लागेल.स्पून फिडींग ची सवय सोडावी लागेल.जास्त मेहनत घ्यावी लागेल.

आता प्रत्येक विद्यार्थ्यासाठी क्रेडिट बँक असेल.जसजसे विषय उत्तीर्ण व्हाल तसे तुमचे क्रेडिट तुमच्या खात्यात जमा होत जातील. अमुक संख्येचे क्रेडिट जमा झाले की डिप्लोमा,वाढीव क्रेडिट कमावले कित पदवी,आणखीन क्रेडिट वाढले तर ऑनर्स,नंतर पी जी डिप्लोमा,नंतर पदव्युत्तर पदवी असे चढत्या श्रेणीने , टप्प्या टप्प्याने शिक्षण घेता येईल.सर्वच क्रेडिट कमावण्यासाठी कॉलेजात,वर्गात, जाण्याची गरज राहणार नाही. काही विषय ऑनलाईन शिकून परीक्षा देता येईल.प्रोजेक्ट,उद्योग क्षेत्रातील कृती अनुभव, सेमिनार अशा माध्यमातून देखील क्रेडिट कमावण्याचे स्वातंत्र्य असेल.

विशेष म्हणजे एकाच शाखेचे विषय घेण्याचे बंधन राहणार नाही. स्पेशलायझेशन चा जमाना गेला आता.तुम्हाला विविध शाखाचे थोडे थोडे का होईना ज्ञान गरजेचे आहे.फिजिक्स मध्ये पदवी घेतलेल्या शास्त्रज्ञाला केमिस्ट्री त नोबेल परितोषिक मिळते.ते बायो केमेस्ट्री शिकवतात अन् बायो टेक्नॉलॉजी विषयात संशोधन करतात.(हे उदा अमेरिकेत स्थायिक भारतीय शास्त्रज्ञाचे आहे). यावरून काळ कसा बदलालाय,भविष्याच्या गरजा कशा असतील याची कल्पना यावी. आर्ट्स, कॉमर्स,सोशल सायन्स या क्षेत्रात देखील हेच तत्व लागू होते.म्हणजे फक्त मराठी,हिंदी साहित्याचे विषय घेऊन एम ए करून उपयोग नाही.पत्रकारिता,मास कमुनिकेशन,इतिहास ,राज्यशास्त्र या विषयाचे ज्ञान असेल तर नोकरीसाठी तुमची किंमत निश्चित वाढेल. नव्या शैक्षणिक धोरणात हे अंतर्भूत आहे.

हे सारे अमलात आणायचे तर शिक्षक,विद्यार्थी,प्रशासन अधिकारी सर्वांना मनोवृत्तीत बदल करावे लागतील.कॉलेजच्या दहा ते पाच अशा ठराविक वेळा चालणार नाहीत.आंतर शाखीय शिक्षण घ्यायचे तर वेळापत्रक तुमच्या सोयीचे नसेल.तुम्हाला स्वतःची वेळ म्यानेज करावी लागेल.प्रयोग शाळा,ग्रंथालय जास्त वेळ उघडे ठेवावे लागेल.आय आय टी सारख्या संस्थेत हे आधी पासून आहे.त्यामुळे अंमलबजावणीत अडचण काहीच नाही. फक्त हे क्रांतिकारक बदल आपण खुशीने स्वीकारले पाहिजेत. जास्तीत जास्त शिकवण्या पेक्षा जास्तीत जास्त शिकण्यावर भर हवा.मूल्यांकन पद्धतीत देखील अमुलाग्र बदल अपेक्षित आहेत. सतत मूल्यमापन व्हावे.सेमीस्टर शेवटी तीन तासाचा ,शंभर मार्का चा पेपर ,आठ पैकी पाच प्रश्न सोडविण्याचे ऑप्शन हे सारे जुने मॉडेल बदलावे लागेल.चुका शोधण्या पेक्षा काय किती समजले हे तपासावे लागेल.नियमित विषया बरोबर व्यक्तिमत्व विकास,नैतिकता,संवाद कौशल्य, टिमवर्क, जागतिक घडामोडी,पर्यावरण,समाजभान या वर्ग बाह्य विषयावर देखील तितकेच लक्ष केंद्रित करावे लागेल.हे विषय क्रेडिट बँकेचे महत्वाचे भाग असतील. नवे शैक्षणिक धोरण प्रत्येक स्तरावर इन लेटर अँड स्पिरीट अमलात आणले तर आपले एकूणच शिक्षण जागतिक दर्जाचे होईल हे निश्चित..

(जाता जाता..नवे बदल करताना विद्यापीठांनी फुकट पदव्या( सन्माननीय डॉक्टरेट, डी लिट )वाटणे बंद केले पाहिजे.व्यक्तीचे सामाजिक, राजकीय, कला, क्रीडा क्षेत्रातील काम कितीही मोठे असले तरी विद्यापीठाचे पदवी ग्रहणाचे नियम न पाळता पदवी दान करणे केव्हाही अयोग्यच आहे..)

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# भारतीय संविधानात डॉ. आंबेडकरांच्या विद्वत्तेची छाप



भीमराव सरवदे
संपर्क क्र. ९४०५४६६४४१

आधुनिक केसरी

**स्वतंत्र भारताची राज्यघटना ही आपल्यासाठी केवळ कायदा लिहिलेला दस्तऐवज नसून तिचे मानवी मूल्य खूप अधिक आहे, ज्यामध्ये संपूर्ण समाजासाठी आणि विशेषत: वंचित घटकांसाठी शासनाचे नियम तसेच विविध प्रमुख संस्था आणि राजकारण्यांची कार्ये परिभाषित करण्यात आलेली आहेत. शतावधी वर्षांपासून हिंदू धर्मातील विषमतावादी सामाजिक व्यवस्थेमुळे वंचित समाजसमूहाचे अनेक प्रकारे शोषण झाले असल्यामुळे कदाचित त्यांना नव्याने स्वीकारलेल्या भारतीय संविधानाकडून खूप अपेक्षा होत्या. संविधानाच्या इतिहासात डोकावल्यास असे आढळून येते की, फेब्रुवारी १९२८ मध्ये काँग्रेसने मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली एक घटना समिती नियुक्त केली होती, तिला नेहरू घटना समिती म्हटले जाते. या समितीने ऑगस्ट १९२८ मध्ये भारताच्या भावी संविधानाचे प्रारूप तयार केले. हे प्रारूप तयार करतांना सर्व धर्म आणि पक्षांना उदा. मुस्लिम, शीख, पारशी, ख्रिश्चन, अँग्लो इंडियन यांच्या प्रमुखांना चर्चेसाठी बोलाविले होते. अस्पृश्यांच्या प्रतिनिधींना मात्र हेतुपुरस्सरपणे टाळले गेले. याच दरम्यान अस्पृश्यांच्या वेगळ्या राजकीय हक्काच्या मागणीने जोर धरला होता परंतु त्याकडेही दुर्लक्ष केले गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याचा निषेद म्हणून दिनांक १८ जानेवारी १९२९ च्या बहिष्कृत भारत या आपल्या वृत्तपत्रात नेहरू कमिशनची योजना व हिंदुस्थानचे भवितव्य; या शीर्षकाखाली लेख लिहिला होता.**

त्यात बाबासाहेब म्हणाले होते की, ;हिंदू समाजाच्या उतरंडीला धक्का न लावता वरच्यांना वरती व खालच्यांना खाली ठेवून स्वराज्य सत्ता संपादन करण्याचा हा ब्राह्मणी कावा आहे, असे आमचे स्पष्ट मत आहे. नाहीतर ज्या सवलती मुसलमानांना देण्यात आल्या त्या सवलती मागासलेल्या हिंदूंना किंवा अस्पृश्यांना देण्यात आल्या नसत्या काय ? पुढे १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्राचा दर्जा मिळाला. तत्पूर्वी संविधान सभेचे गठन करण्यात आले होते. या संविधान सभेने डॉ आंबेडकरांची २९ ऑगस्ट १९४७ रोजी संविधान मसुदा समितीच्या अध्यक्षपदी निवड केली. डॉ आंबेडकरांनी जगभरातल्या संविधानाचा अभ्यास करून स्वतः संपूर्ण संविधानाचा मसुदा तयार करून २१ फेब्रुवारी १९४८ रोजी संविधान सभेचे अध्यक्ष डॉ राजेंद्र प्रसाद यांना पुढील चर्चेसाठी सुपूर्द केला. याचा अर्थ असा कि डॉ आंबेडकरांनी संविधान केवळ ५ महिने २२ दिवसात लिहून तयार केले होते. म्हणूनच डॉ. आंबेडकरांना भारतीय राज्यघटनेचे मुख्य शिल्पकार मानले जाते.

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी राज्यघटना स्वीकारली, जी २६ जानेवारी १९५० रोजी अंमलात आली. ही राज्यघटना लोकशाही राज्याची स्थापना करणाऱ्या जगातील महाकाय संविधानांपैकी एक मानली जाते. १९५० मध्ये भारतीय राज्यघटनेची स्थापना ही केवळ भारताच्या राजकीय इतिहासातच नव्हे तर सामाजिक न्याय आणि मानवी हक्कांच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण घटना होती. या संविधानाने भारतीय उपखंडात नागरिकांना समान अधिकार आणि विशेषाधिकार प्रदान करून मानवकल्याण आणि विकासाचे नवीन मार्ग खुले केले आहेत. खरेतर, असे गृहीत धरले गेले होते की नवीन राज्यघटना लिंग, जात आणि धर्मावर आधारित शोषण संपुष्टात आणण्यासाठी पुरेशी प्रभावी ठरेल, तसेच श्रेणीबद्ध आणि विषम सामाजिक संरचनेत वाढत्या प्रमाणात बदल घडवून आणेल. जेणेकरून व्यक्ती सन्मानाने जगू शकेल आणि समान नागरी हक्क प्राप्त करू शकेल. कोट्यवधी लोकांच्या जीवनातील, विशेषतः वंचित समुदायांच्या जीवनातील हा पहिला क्षण होता, ज्यामुळे यांना नवीन संविधान स्वीकारल्यानंतर समान वागणूक आणि हक्क मिळण्याची शक्यता निर्माण झाली होती. डॉ. आंबेडकरांनी तयार केलेल्या या संविधानात सर्व नागरिकांना संवैधानिक व्यापक संरक्षण आणि हमी दिली आहे, उदाहरणार्थ, सामाजिक-आर्थिक हक्क, नागरी स्वातंत्र्य, धर्म स्वातंत्र्य, अस्पृश्यता निर्मूलन आणि सर्व प्रकारच्या भेदभावांना प्रतिबंध इत्यादी. घटनात्मक अधिकारांव्यतिरिक्त, त्यांनी नागरी सेवा, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विशेषतः अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या सदस्यांसाठी नोकऱ्यांमध्ये आरक्षणाची योजना सुरू करण्यासाठी संविधानसभेचे समर्थन प्राप्त केले होते. डॉ. आंबेडकर सामाजिक न्याय आणि सामाजिक समतेसाठी एक शूर सेनानी होते आणि अशा प्रकारे ते नेते, मुक्तिदाता, नायक, उद्धारकर्ता, सामाजिक दुर्लक्षित वर्गाच्या आवाजाचे प्रतिनिधी म्हणून ओळखले जातात. १७ डिसेंबर १९४६ च्या संविधान सभेतील भाषणात बाबासाहेब म्हणतात, आज आपण राजकीय, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या विभागलेले आहोत, याची मला जाणीव आहे. आपण एक दुसऱ्यांविरुद्ध लढणाऱ्या छावण्यांचा समूह आहोत आणि मी तर यापुढेही जाऊन हेही मान्य करेन की, बहुशः अशाच एका छावणीचा मीही एक नेता आहे. परंतु महोदय हे सर्व खरे असले तरी मला



पूर्ण खात्री आहे की, अनुकूल काळ व परिस्थिती निर्माण केल्यास जगातील कोणतीही शक्ती या देशाला एक होण्यापासून परावृत्त करू शकणार

नाही. विभिन्न जाती व संप्रदाय असले तरी आपण एकसंध झाल्याशिवाय राहणार नाही, याबद्दल माझ्या मनात कसलीही शंका नाही. ( डॉ बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ भाग ३ पृष्ठ क्र.५२ ) अशाप्रकारे त्यांनी समाजातील वंचित घटकांसाठी आपली बांधिलकी स्पष्टपणे नमूद करून राष्ट्रीय ऐक्य वृद्धिंगत करण्याचा संदेश देशवासियांना दिला होता.

डॉ. आंबेडकरांचा असा विश्वास होता की, राज्यघटना हे समाजातील सर्व घटकांना विशेषतः समाजातील दबलेल्या घटकांना न्याय आणि समता सुनिश्चित करण्यासाठी एक प्रभावी साधन असू शकते. त्यांना घटनात्मक तरतुदींच्या सहाय्याने अनेक उद्दिष्टे साध्य करण्याची इच्छा होती आणि खरेतर, काही तरतुदी अशा आहेत, ज्यातून भारतीय राज्यघटनेवरील त्यांच्या दूरदृष्टीचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. भारतीय संविधान अनुच्छेद १९-२२ च्या द्वारे स्वातंत्र्याच्या अधिकाराला खूप महत्त्व देते. डॉ. आंबेडकरांनी परखडपणे सांगितले होते की, बदलत्या समाजात, जुन्या मूल्यांत सतत क्रांती घडवली पाहिजे आणि हिंदूंनी हे सुद्धा समजून घेतले पाहिजे की, जसे माणसांच्या कृतींचे मूल्यमापन करण्यासाठी मानक असले पाहिजेत तसेच त्या मानकामध्ये बदल करण्याची तयारीसुद्धा असली पाहिजे." ( डॉ बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषणे, जातिव्यवस्थेचे निर्मूलन, पृ. ६७ ). राज्यघटनेच्या तरल संकल्पनेवर त्यांचा ठाम विश्वास होता. भारतीय राज्यघटनेत अस्पृश्यता आणि जातीवर आधारित भेदभावाशी संबंधित डॉ आंबेडकरांची दूरदृष्टी प्राप्त करण्याचा प्रयत्न करणाऱ्या अनेक तरतुदी आहेत. मागासवर्गीय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दलित वर्गाकडे संविधान निर्मात्यांनी विशेष लक्ष वेधले. किंबहुना, या घटकांचे उत्थान ही राज्याची आणि संस्थेची

महत्त्वाची जबाबदारी म्हणून ओळखली गेली आहे. उपेक्षित घटकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी त्यांनी संविधान सभेत विविध तरतुदी मांडल्या. अनुच्छेद १५ (४), १६ (४), १९(१) (ड) व (ई), २९ (२), २७५, ३३०, ३३५ आणि ३४० हे त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक न्यायाच्या संकल्पनांचे स्पष्ट प्रतिबिंब आहेत. ही कलमे सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या हितासाठी विशेष तरतूद करण्याचेअधिकार राज्याला देतात. भारतीय राज्यघटनेवर डॉ आंबेडकरांचा प्रभाव समजून घेण्यासाठी १४, १५ आणि १७ या कलमांवर अधिकदृष्टिक्षेप टाकणे महत्वाचे आहे. अनुच्छेद १४ च्या तरतुदीनुसार राज्य कोणत्याही व्यक्तीला कायद्यांसमोर समानता नाकारणार नाही किंवा भारताच्या हद्दीतील कायद्यांचे समान संरक्षण नाकारणार नाही. अनुच्छेद १५ धर्म, जात, वंश लिंग किंवा जन्माच्या ठिकाणच्या आधारे भेदभाव करण्यास प्रतिबंधित करते. अनुच्छेद १७ ही राज्यघटनेत केलेली सर्वात आधारभूत तरतूद आहे जी अस्पृश्यता नष्ट करते आणि कोणत्याही स्वरूपात त्याच्या प्रथांवर बंदी घालते. अस्पृश्यतेच्या प्रथांचे गुन्हेगारीकरण करून आणि त्याचे

पालन करणाऱ्यांना कायद्यानुसार शिक्षेची व्यवस्था करून श्रेणीबद्ध आणि विविधता व विषमता

असलेल्या भारतात सामाजिक क्रांती घडवून आणणारी ही तरतूद म्हणून मानली जाते. शिवाय, अनुच्छेद २३ द्वारे माणसांचा अपव्यापार आणि वेठबिगारी पद्धतीवर बंदी घालण्यात आली आहे,. या सर्व तरतुदी खरोखरच अस्पृश्यतेच्या दुष्ट रुढींचे, ज्या रूढी समाजातील एकतेच्या भावना नष्ट करीत आहेत आणि देशाला विघटनाच्या धोक्याला कारणीभूत ठरत आहेत त्याचे उच्चाटन करण्याच्या त्यांच्या महान दूरदृष्टीचे प्रतिबिंब आहेत. डॉ आंबेडकरांची हीच दूरदृष्टी अस्पृश्यांचे जीवन सन्मानित करण्याबरोबरच, विषमतेचे असंख्य प्रकार प्रतिबंधित करते. डॉ. आंबेडकरांनी जरी खालच्या जातींच्या सक्षमीकरणासाठी भारतीय राज्यघटनेत महत्वाच्या तरतुदींचा समावेश करण्यात यश मिळवले असले, तरी शोषित वर्गांसाठी मानवी आणि नागरी हक्कांची तरतूद करणे त्यांना न्याय आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी पुरेसे नाही, जोपर्यंत त्या हक्कांचे पालन करण्यासाठी कायदेशीर तरतुदी आणि संरक्षणाची जोड दिली जाणार नाही, या वस्तुस्थितीची त्यांना चांगलीच जाण

होती. याच अनुषंगाने डॉ. आंबेडकर संविधान सभेत म्हणाले होते की, आपल्या सर्वांना याची जाणीव आहे की जोपर्यंत उपाय उपलब्ध करून दिले जात नाहीत तोपर्यंत अधिकारांना काहीही अर्थ नाही, ज्यायोगे लोक हक्कांपासून वंचित ठेवल्यास न्याय मिळवण्याचा प्रयत्न करू शकतात. या पार्श्वभूमीवर भारतीय राज्यघटनेत घटनात्मक उपायांची मांडणी करण्यात आली आहे. अनुच्छेद ३२ द्वारा देशाच्या सर्व नागरिकांना त्यांच्या मूलभूत अधिकारांचे आणि घटनात्मक विशेषाधिकारांचे कोणत्याही राज्यसंस्था किंवा व्यक्तीकडून उल्लंघन झाल्यास सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा अधिकार प्रदान करते. त्यामुळेच कदाचित डॉ. आंबेडकरांनी या तरतुदीला राज्यघटनेचा आत्मा आणि त्याचे हृदय मानले आहे. डॉ आंबेडकरांनी संविधान सभेत जीवनाच्या परस्परविरोधी स्वरूपाकडे ठामपणे लक्ष वेधले होते, विशेष म्हणजे त्यांनी असा दावा केला होता की, राजकीय जीवनात आपण एक माणूस एक मत आणि एक मत एक मूल्य हे तत्त्व मान्य करणार आहोत; परंतु आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात, आपण सामाजिक संरचनेच्या कारणास्तव, एक माणूस एक मूल्य या तत्त्वाला नाकारत राहू. कदाचित त्यामुळेच त्यांनी भारतीय राज्यघटनेच्या भाग ४ मधील अनुच्छेद ३६ ते ५१ मध्ये नमूद केलेल्या राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे समाविष्ट केली आहेत. समाजातील वंचित घटकांचे हित जोपासण्यासाठी प्रयत्न करण्यासाठी राज्याला मार्गदर्शन करून सामाजिक व आर्थिक लोकशाहीच्या आदर्शांना चालना देण्यासाठी हा भाग असल्याचे सांगितले जाते. उदाहरणार्थ; अनुच्छेद ४६ प्रमाणे दुर्बल घटकांच्या आणि विशेषतः अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या शैक्षणिक आणि आर्थिक हितसंबंधांना राज्य विशेष काळजीने प्रोत्साहन देईल आणि सामाजिक अन्याय आणि सर्व प्रकारच्या शोषणापासून त्यांचे संरक्षण करेल. तथापि, हे लक्षात घेतले पाहिजे की, मूलभूत अधिकारांच्या विपरीत, निर्देशक तत्त्वे ही राज्यांसाठी केवळ दुर्बल घटकांच्या हितासाठी विशिष्ट कृती करण्याच्या विविध निर्देशांचा एक संच आहे. या वस्तुस्थितीवर डॉ. आंबेडकरांनीही भर दिला होता, निर्देशक तत्त्वे ही राज्यघटनेने देशातील विविध सरकारांवर लादलेल्या केवळ जबाबदाऱ्या आहेत, जरी सरकार ते पार पाडण्यात अपयशी ठरले, तरी त्याविरुद्ध फार काही करता येत नाही. या तरतुदींच्या अनुषंगाने सत्ताधाऱ्यांच्या सद्सद्विवेकबुद्धीचा कसलागतो, हे निश्चित! सर्व धर्मांना समान आदर देणाऱ्या धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावर डॉ आंबेडकरांची अढळ श्रद्धा होती. या संदर्भात, त्यांनी असा युक्तिवाद केला होता की, राज्य कोणत्याही धर्माला राज्यधर्म म्हणून मान्यता देणार नाही. डॉ. आंबेडकरांनी मांडलेली धर्मनिरपेक्षतेची ही संकल्पना अनुच्छेद २५-२८ नुसार भारतीय राज्यघटनेने आपल्या नागरिकांना कोणत्याही धर्मावर विश्वास ठेवण्याचे आणि त्यांच्या धार्मिक व्यवहाराचे व्यवस्थापन करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे. शिवाय, 'सेक्युलर' हा शब्द १९७६ मध्ये राज्यघटनेच्या प्रास्ताविकात ४२ व्या दुरुस्तीद्वारे समाविष्ट करण्यात आला आहे. धर्मनिरपेक्षतेची डॉ आंबेडकरांची दृष्टी ही मूलगामी प्रकारची असून कोणत्याही धार्मिक वाईट वागणुकीविरुद्ध, द्वेषाविरूद्ध आणि भेदभावाविरूद्ध बंड करणारी आहे.भारतीय संविधान वाचत असतांना डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञानाचा उमटलेला अमीट असा ठसा विविध तरतुदींमधून ठळकपणे दिसून येतो. प्रामुख्याने प्रस्तावना, भाग ३, भाग ४ आणि भाग १६ मध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता या संकल्पनांचे समर्थन करून आणि देशाच्या एकतेचे रक्षण करून न्याय्य समाज स्थापन करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. त्यांना असे वाटत होते की, हिंदू समाजाचा प्रश्न सोडवण्यासाठी लवकरात लवकर आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात समता आणि बंधुत्व सुनिश्चित करणे आवश्यक आहे. हजारो जातींमध्ये विभागलेले लोक हे एक राष्ट्र असू शकत नाही, या वस्तुस्थितीची डॉ. आंबेडकरांना जाणीव होती. त्यामुळे सामाजिक ऐक्याशिवाय पर्याय नाही असे त्यांना वाटत होते. या तिन्ही तत्त्वांना संविधानाच्या प्रस्तावनेत महत्त्वाचे स्थान दिलेले दिसून येते. म्हणूनच भारतीय संविधानाची महानता अखिल विश्वाने मान्य केलेली आहे!

**(लेखक सार्वजनिक क्षेत्रातील निवृत्तवरिष्ठ अधिकारी असून आंबेडकरी व पेरियार चळवळीचे अभ्यासक आहेत.)**

# संपादक अरविंद दोडे यांचे स्त्री - संत दर्शन

आधुनिक केसरी

महाभारताच्या वन पर्वामध्ये यक्ष प्रश्नाचा एक सर्ग आहे. पक्ष्याचा सर्व प्रश्नांची अचूक उत्तरे दिल्यास सरोवरातील विषारी पाणी पिऊन मृत पावलेल्या भावंडांना जीवनदान मिळण्याचे युधिष्ठिराला आश्वासन मिळाले होते. त्या प्रश्नामध्ये एक प्रश्न यक्षाने युधिष्ठिराला विचारला, ' का दिक् ?' समाजाला वळण लावण्यासाठी दिशा कोणती ? युधिष्ठिराने उत्तर दिले, ' संतो दिक'! समाजाचे दिशा दर्शन संत करतात, मार्गदर्शन करू शकतात, किंबहुना संतांची तीच भूमिका असते, त्यांचे जीवनाचे प्रयोजनही तेच असते, परमेश्वर प्राप्तीची आयुष्यभर साधना करून ते आत्मोद्धर करून घेतात. सक्रिय उपदेशाद्वारे त्या साधनेच्या फलश्रुतीचे प्रसाद वितरण करून ते लोकोद्धार साधतात. हा त्यांच्या आत्मोन्नतीचाच दुसरा अविष्कार असतो. निस्सीम साधनेचे पुण्य फळाला आले की ईश्वरी साक्षात्कार होतो. जीवनाचे साफल्य झाल्याची धन्यता मिळते. त्या क्षणी साधनेने प्रज्वलित झालेल्या अस्तित्वाचा प्रदीप समाजाला प्रकाश देण्याचे कार्य करतो. हा प्रकाश समाजाला काळोखातून निर्विघ्न चालण्याची शक्ती देतो. रस्त्यातले खाचखळगे ओलांडण्याची तयारी करून घेतो. संतांचे केवळ अस्तित्वच समाजाला प्रेरक ठरते. संतांनाही समाजप्रबोधनाची वेगळी आठवण करून द्यावी लागत नाही तो त्यांचा सहज धर्म बनतो. पवित्र आणि पावन अशा आपल्या महाराष्ट्राच्या थोर भूमीत अनेक संत महात्मे अवतरले. समाज हितासाठी अवघे आयुष्य पणाला लावून योग्य - अयोग्य, शुभ - अशुभ , चांगले - वाईट अशा विविध मुद्द्यांवर आपली विचारधारा मांडत मार्गदर्शनपर आणि प्रबोधनपर लेखन तसेच विवेचन केले. संत साहित्य आणि समाज प्रबोधन,समाज परिवर्तन, सामाजिक मूल्ये, सामाजिक प्रभाव या विषयांवर अभ्यास करत असताना असे लक्षात येते की या साहित्य प्रकारात संत कवी आणि कवयित्री या दोघांचेही कर्तृत्व, योगदान,समर्पण, समाजाप्रती आत्मीयता ही अगदी समसमान आहे, वंदनीय आहे.




हेच समजून घेण्यासाठी संत कवी आणि संत कवयित्री यांच्या साहित्याचा दोन्ही साहित्याचा स्वतंत्रपणे अभ्यास करणे आवश्यक आहे. संत कवयित्री साहित्य याविषयी सखोल चिंतन करतांना संत कवयित्री यांची उपलब्ध माहिती, वैयक्तिक - कौटुंबिक - सामाजिक परिस्थिती आणि त्यांचे साहित्य या सर्वांचाच एकत्रित समग्र विचार केला जातो.

यासंबंधी मार्गदर्शनपर आणि अभ्यासपर पुस्तकांमध्ये एक अत्यंत उपयोगी आणि माहितीपर असे पुस्तक वाचनात आले. ते म्हणजे लेखक प्रा.श्री अरविंद दोडे यांनी संकलित, संपादित केलेले ' स्त्री - संतदर्शन ' ! प्रकाशक श्री लवू बागवे यांच्या मुंबई येथील सुदर्शन प्रकाशन संस्थेने सन 2005 या वर्षी प्रकाशित केलेले आणि सुदर्शन आर्ट प्रिंटिंग प्रेस येथून मुद्रित झालेले तसेच युनिक सिस्टीम यांची अचूक अक्षर जुळणी आणि स्टुडिओ स्कार्लेट यांचे समर्पक मुखपृष्ठ असलेले या वर्षी दोडे सरांचे हे पुस्तक संत कवयित्री साहित्य अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि संत साहित्य आवडीने वाचणाऱ्या वाचकांना अतीशय उपयोगी आहे.

बत्तीस लेखकांनी लिहिलेली मुक्ताई, महदंबा, जनाबाई, गोणाई राजाई, सोंसू बाई, नागरी बाई, बहिणाबाई, मीराबाई, निर्मला बाई, भगिनी निवेदिता, कान्होपात्रा, वेणा पात्रा , अशा महान संत कवयित्रींची समग्र माहिती या पुस्तकात उपलब्ध आहे.

पुस्तकातील लेखरुपी अमूल्य योगदान लक्षात घेता सर्वच आदरणीय लेखकांची नावे इथे नमूद करणे गरजेचे आहे जेणेकरून सर्वांपर्यंत या पुस्तकाच्या समावेशकतेची माहिती होईल. डॉक्टर विजया संगवई , डॉक्टर उषा देशमुख, डॉक्टर सुशीला पाटील , डॉक्टर माधुरी पणशीकर, डॉक्टर इनामदार, वा. ल.मंजुळ, वर्षा देवधर, आशा धारप, डॉक्टर पंकजा शुक्ल, जी, एस. सामंत, अनघा देशपांडे, डॉक्टर पुष्पा लिमये, उषा रा. असुंडी, गौतम ब्रम्हे , जी.जी कुलकर्णी , संजय सबनीस, डॉक्टर शोभा घोलप , राजकुवर बोबडे , डॉक्टर सुमती देशपांडे, सद्‌गुरू तोडकर महाराज , वसुधा जोगळेकर , डॉक्टर मंजुषा गोखले, नीला कृष्ण जोशी, श्री. पु. गोखले, रामभाऊ जोशी, डॉक्टर सुनिता तांबे , स्वामी घनानंद, चंद्रा कुमारी हांडू, जॉन त्रिनिक, रोमा चौधरी, श्रीमती चित थाँग, आईझॅक चॅट या सर्व लेखकांनी संत कवयित्रींचे माहितीपर लेख या पुस्तकात वाचायला मिळतील. प्रस्तावनेत संकलक, संपादक श्री दोडे लिहितात की, " संत पदाला पोहोचलेली स्त्री कशी असते, दिसते कशी , जगते कशी, वागते कशी, असे अनेक प्रश्न सर्वांच्या मनात असतात. स्त्री संतांचे काव्य आणि कर्तृत्व यांचा परिचय व्हावा म्हणून हा शब्द दर्शनाचा प्रयत्न आहे. अनुक्रमणिका बघत असतानाच लक्षात येते की फक्त महाराष्ट्रातील मराठी हिंदु संत कवयित्रीचेच व्यक्तिमत्त्व दर्शन या पुस्तकात अंतर्भूत केले नाही तर बौद्ध, जैन, ख्रिस्ती, सूफी, यहुदी, ब्रह्मदेशी अशा संत कवयित्रींची ओळख या पुस्तकातून करून दिली आहे. इतिहास हा विषय आवडो न आवडो,पण आपल्या भूमीतील संतांचा उल्लेख ऐकताच, वाचताच हृदय अतीव आदराने भरून येते. मग त्यांच्याविषयी लिहिलेली माहिती वाचतांनाही एखादी पोथीच वाचल्यासारखे वाटते.

असेच मंत्रमुग्ध करणारे आणि त्याचवेळी आपल्या ज्ञानाचा घडा अजून भरणारे हे पुस्तक सर्वांच्या संग्रही असावे असेच आहे. या पुस्तकातून संत कवयित्री माहिती एकत्रितपणे वाचकांसाठी उपलब्ध करून दिल्या बद्दल संकलक, संपादक , लेखक श्री अरविंद दोडे यांचे समस्त वाचकांतर्फे अभिनंदन आणि आभार!

# समाधान

आधुनिक केसरी

**दुकानाचा दरवाजा उघडला. दुकानात झाडू मारून देवपूजा केली आणि आता ग्राहकाची वाट पाहायला लागलो. माझं दुकान म्हणजेच माझं छत्र, माझं अस्तित्व. माझं दुकान म्हणजे शोभेच्या वस्तूंचं भंडार. त्या विकून जे काय भेटेल त्यावर माझी गुजराण होते. तसं मी मीडिअम श्रीमंत आहे बरं का ? पण समाधान नाही जीवाला. सकाळी उठलं की धावपळ सुरु. लोकलची वाट बघायची, नंतर धक्के खात आपल्या स्थानकावर पोहचायचं, दुकानात जायचं, नवीन आलेलं सामान, ग्राहक, इतर बिल अशी भरपूर कामं मला असतात. स्वतःला जेवायला पण वेळ मिळत नाही कधी कधी. रात्री दिवसभराचा हिशोब करून मी निघतो. माझं घर एका टोकाला आणि दुकान दुसऱ्या टोकाला. पण आयुष्यात सगळं करावंच लागतं.**

तो दिवस मी कधीच विसरणार नाही ज्याने मला समाधान काय असतं ते शिकवलं.

एक फॉरेनर माझ्या दुकानात आला. तसं मनमे लाडू फुटा. सर्व मालाच्या किंमती मनात दुपटीने वाढल्या. पण मला एक टेन्शन आलं होतं. त्याची भाषा मला कळणार नाही आणि माझी भाषा त्याला, आता कसं होणार ?

तो आला आणि हसत हसत Hi बोलून सर्व दुकान बघू लागला. आजपर्यंत माझ्या दुकानात येऊन कुणीच एवढं बारकाईने वस्तू पाहिल्या नाहीत तेवढ्या बारकाईने तो वस्तू पाहत होता. अर्धा तास तो सर्व वस्तू पाहून मला एका वस्तूकडे बोट करून बोलला,

फॉरेनरः Pack this bro.

मला एवढं इंग्लिश कळत नाही पण त्याने वस्तू पॅक करायला सांगितली. तसं मी तो बॉक्स आणून पॅक करून त्याच्यासमोर ठेवला.

फॉरेनरः how much ?

आता मला काय बोलतोय ते कळलं नाही. मी त्याच्याकडे बघून बोललो, "व्हॉट सर ?"

त्याला बरोबर कळलं मला काही इंग्लिश कळत नाही. फॉरेनर त्या वस्तूकडे बोट दाखवून बोलला, "money..!"

आता एवढं समजायला मी काय वेडा नव्हतो. लगेच डोक्यात पैशाचा हिशोब सुरु झाला. त्याची जी किंमत त्याला दुप्पट ते तिप्पट वाढवून सांगायची. मी लगेच बोललो, "500 rupees." एवढं इंग्लिश येत मला. जी वस्तू मी १०० ला विकतो ती त्याला मी पाच पटीने विकत होतो. त्याने पण काही न बोलता पाकिटातून पैसे काढून मला दिले आणि तो 'Thank you!' बोलून निघाला.

पैसे काढताना एक गोष्ट माझ्या लक्षात आली की, त्याने १०० च्या पाच नोटा नाही तर १०० च्या ३ आणि ५०० च्या दोन असे १३०० रुपये मला दिले, आणि हे मला कळलं पण मी गप्प बसलो. मी मनातल्या मनात खुश झालो. चला एकाला येडा बनवला. माझ्या मनात स्वार्थ आला. तो जातांना मी त्याला बोलू शकलो असतो, पण मी गप्प बसलो.

दिवस संपला. हिशोब करुन मी घरी निघालो. घरी गेलो, जेवलो आणि झोपायचा प्रयत्न करायला लागलो पण मला झोप काही लागेना. सारखा त्या फॉरेनरचा विचार येऊ लागला. काहीच समजतं नव्हतं काय चाललायं. दररोज झोप लागते पण आज काय झोप लागेनाचं. मी विचार केला उद्या तो येईल. त्याला ते पैसे परत देऊ. मग डोळा लागला.

दुसरा दिवस उजाडला. मी पूर्ण दिवस त्याची वाट पहिली पण तो काही आला नाही. काहीच सुचत नव्हतं. इथे माझे १० रुपये कुणाकडे राहिले तर मला कसंतरी होतं, हा तर १००० च्या वर मला चुकून देऊन गेला.

मी विचार केला 'उद्या येईल तो' आणि घरी आलो. परत झोप लागत नव्हती.असे पाच दिवस झाले. मला काय करावं कळतच नव्हतं.

सहाव्या दिवशी मी एक युक्ती करायचं ठरवलं. माझ्या दुकानातल्या सीसीटीव्ही कॅमेरातून फोटो घेऊन मी दी टाइम्स ऑफ इंडियाच्या पेपर मध्ये छापला. त्यात माझा मोबाईल नं. आणि नाव दिलं आणि फोटोखाली एक संदेश लिहला, 'I AM SEARCHING YOU.' हे मी माझ्या मित्राच्या इंग्लिश हायस्कुलच्या मुलाकडून लिहून घेतलं होतं.

एक आठवड्याने मला त्याचा फोन आला.

"WHO ARE YOU ?"

मला काहीच कळत नव्हतं काय बोलावं. मी लगेच बोललो,

"सर, आय एम मनी पर्सन..!!"



फॉरेनरः "HI Brother" (तो हसत हसत म्हणाला.)

मीः "Meet u..!" मला काय बोलायचं कळत नव्हतं पण जे येतंय ते सगळं बोलून दाखवत होतो.

फॉरेनरः "Yes . I will come in next week at your shop, bye...!!"

मला काहीच समजलं नाही. एकच कळलं तो come म्हणजे येणारच. मी खुश झालो आणि दररोज त्याची वाट बघू लागलो. आज येईल उद्या येईल, असे करता करता एक आठवडा निघून गेला तरी तो आला नव्हता.

मी त्या दिवशी आलेल्या फोन वर फोन केला. तिकडून एक बाई बोलली, "नमस्ते सर. this is ताज हॉटेल, how can I help You ?"

मला काहीच कळलं नाही. पण ताज हॉटेल शब्द कळला. मी मराठीतच बोललो, "म्याडम तिथं कुणी फॉरेनर आहे का ?" माझं नशीब थोर ती बाई मराठी निघाली. "सर इथे खूप फॉरेनर्स आहेत. तुम्हाला कुणाशी बोलायचं आहे."

आता काय बोलू. "त्यांचा पेपरमध्ये फोटो आला होता ना, ते दी टाइम्स ऑफ इंडिया मध्ये."

बाईः "अरे हा.. ते केनी सर. तुम्ही दिलेला का तो फोटो. I was searching You."

मीः हो.

बाईः तुम्ही खरंच हुशार आहात. अहो पण ते सर आजच गेले.

मी उदास होऊन फोन ठेवला आणि बसलो तेवढ्यात ते सर समोर येऊन उभे राहिले. त्यांच्यासोबत अजून एक माणूस आला होता.

मीः केनी सर.

केनी सरः Hi Bro...!!

मला काहीच कळलं नाही. त्यांनी त्या माणसाला त्यांच्या भाषेत काही तरी सांगितलं आणि तो भारतीय माणूस चक्क माझ्याशी मराठीत बोलला, "माझं नाव राहुल. मी या सरांसोबत काम करतो. सर विचारतायत 'तुम्ही फोन करुन का भेटायला बोलावलं ?'"

मी त्या दिवशी घडलेलं सर्व राहुल सरांना सांगितलं.

राहुल सरः अरे, हे सर अब्जोपती आहेत. तू १००० रुपयांसाठी त्यांना बोलावलं.

मीः सर ते १००० रुपये माझी झोप घेऊन गेले त्याचं काय ?

राहुल सर : म्हणजे ?

मीः काय नाही.

मी सरळ माझ्या पाकिटातून ८०० रुपये काढून केनी सरांना दिले. आणि बोललो, "गिफ्ट ५००. You give 1300."

माझ्या एवढ्याच बोलण्यात सगळं केंनी सरांना समजलं. ते म्हणाले, "You are honest man. Please keep it."

केनी सरांनी अजून ५००० काढून मला दिले व म्हणाले, "This is gift from me. Nice to meet you." एवढंच बोलून ते निघून गेले.

८०० रुपये द्यायला गेलो आणि देवाने ५००० अजून दिले, पण हया पैशाने झोप हरवणार नव्हती. कारण ५००० सोबत झोप आली होती. मी त्यांनी दिलेले ५००० रुपये प्रत्येकी २०० रुपये च्या हिशोबाने रस्त्यावरच्या घाम गाळून काम करणाऱ्या २५ लोकांना वाटले. मला खूप मोठं समाधान मिळालं.

सर्वांना ही गोष्ट जेव्हा मी सांगतो तेव्हा सगळे मला मुर्खात काढतात. पण सर्वांना एक गोष्ट माहित नाही, मी त्या ५००० रुपयात काय काय कमावलं ते...

* केनी सर हा रशियन माणूस असून भारताच्या नौदल विभागासाठी मदतीचं काम करतो. त्याच्या नजरेत १०० % भारताची माझ्या वागण्यामुळे चांगली छाप पडली.

* ज्या लोकांना मी पैसे वाटले ते दिवसाला एका वेळेच्या जेवणासाठी भटकणारी मंडळी होती. त्यांची मनं मी जिंकली.

* आणि माझ्या मनाला मी स्वतः चांगला असल्याची पावती दिली.

* सुखाची झोप विकत घेतली.

* मी २०० रुपयाच्या ऐवजी ११०० रुपये एक्स्ट्रा कमवले आणि एकही स्वतःची माझी कवडी खर्च न करता २५ जणांचं एका वेळेच्या जेवणाचं सुख कमावलं.

एका अब्जाधीश माणसाने मनाच्या श्रीमंतीने समाधान मिळवायला शिकवलं.

**लेखक - अनामिक.**

# पायी चालून जे कमावले ते बोलून गमावले



कॉ. के.के.जांबकर
संपर्क क्र. ८२०८९३८८६५

आधुनिक केसरी

**हिंदीतील ओळी मला आठवल्या त्या अशा, " इस दुनिया में दिवानों की कमी नही है एक ढुंढे तो हजार मिलते है |" मागच्या काही दिवसापासुन काँग्रेस नेत्यांनी सुरु केलेली कन्याकुमारी ते कश्मिर भारत जोडो यात्रा सर्वच मिडियावर विशेषत: महाराष्ट्रात बऱ्याच अंशी गाजलेली आहे. काँग्रेसची बहुतांश मंडळी 2014 पासून सत्ता हातातून गेल्यामुळे सैरभैर झालेली आहे. भाजपवाल्यांनी सामदाम दंडभेदाचा वापर करुन देशातुन काँग्रेसचे होत्याचे नव्हते करत असल्याचे प्रत्येक भारतीय बघत आहेत. सत्तेची नशा ही दारुच्या नशेपेक्षा कैकपटीने तीव्र असते. एकदा का राजकारण्यांना सत्तेची चटक लागली की, ती व त्यातुन मिळणारी खुर्ची व पैसा माणसाला सहजासहजी सोडवत नाही व गुपचुपही बसु देत नाही. एखाद्या व्यसनाधिनतेसारखी वर्तमानातील राजकारणी लोकांची अवस्था होऊन बसलेली आहे. सत्ता हस्तगत करण्यासाठी व कायम सत्तेत राहण्यासाठी राजकारणी जमात नाना क्लृप्त्या, अमिषे, भुलथापी योजना जनतेसमोर ठेऊन सत्तेसाठी कायम धडपडत असतात.**

स्वातंत्र्योत्तर काळानंतर पन्नास वर्ष काँग्रेसची एक हाती सत्ता आपल्या देशावर राहिलेली असुन त्यातील कांही काळ काही काँग्रेसी राजकारणी मंडळीनी जनकल्याण व विकासात्मक प्रक्रियेसाठी आपले प्रामाणिक योगदान दिलेले आहे. पण मध्यंतरीच्या काळात जसजशी सत्तेची नशा व भ्रष्टाचाराची किड काँग्रेसी नेत्याला लागू लागली.

त्यातुनच काँग्रेच्या ऱ्हासाला सुरुवात झाली. याला यांच्या स्वभावातील व्ही.आय.पी. संस्कृती व घराणेशाही ही नक्कीच कारणीभूत आहे. प्रत्येक काँग्रेस नेता सत्ता व सत्तेतुन मिळणारे अर्थाजन व त्यातुनच यांचा सुरु झालेला भ्रष्टारी प्रवास हाही काँग्रेसच्या अधपतनास प्रामुख्याने कारणीभूत ठरला व काँग्रेसी सत्तेच्या ग्रहणाला सुरुवात झाली. तशी काँग्रेसची जुनी नेते मंडळी जनकल्याणासाठी काहीतरी प्रामाणिकपणे करत पण त्याचा म्हणावा तसा फायदा सर्वसामान्य व तळागाळातील जनतेला होत नसे. कारण यातील बरीचशी मंडळी दलाली करण्याच्या राजकारणात अडकलेली होती व आजही आहेत. म्हणुनच जनता काँग्रेच्या घराणेशाही व भ्रष्टाचारी कारभाराला जाम वैतागल्यामुळे 2014 च्या लोकसभा निवडणुकीत जनतेनी भाजपला पर्याय म्हणुन स्विकारले. काँग्रेसच्या भुतकालीन कार्यकाळातील झालेल्या चुका सुधारुन बहुतांशी जनतेला जे हवे आहे ते देण्याचा प्रयत्न भाजपच्या नेत्यांनी चालु ठेवला. अशा जनहितकारी गोष्टी जनतेला पटल्यामुळे 2019 च्या लोकसभेत जनतेने भाजपला पुन्हा निर्विवाद मतदान करुन 300 चा आकडा पार करुन परत सत्तेत बसविले. अशा समयी काँग्रेसच्या निष्क्रियतेमुळे त्यांना विरोधक म्हणुन सुद्धा जनतेने स्विकारले नाही. खैर वर्तमानातील राजकारणात सर्वच राजकीय पक्ष सामदाम दंडभेदाचा वापर करुन सत्ता हस्तगत करत आहेत. त्यातच भाजपच जर असे करत असेल तर फारसे वावगे वाटण्याचे कारण नाही.



अशा सर्व बकाल अवस्थेतुन सवरुन जाण्यासाठी व सत्ता हस्तगततेसाठी राहुल गांधीसारख्या तरुण काँग्रेसी नेत्यांनी भारत जोडो यात्रेचा अजेंडा सुरु केला. वर्तमानात कुठल्याही पक्षाचे राजकीय पुढारी सत्तेविना गुपचूप बसु शकत नाहीत. त्यासाठी नानाविध अमिषे, क्लृप्त्या जनतेला दाखवुन आपणच कसे जनहितकारी आहोत हे दाखविण्याचा सातत्याने प्रयत्न चालु असतो. त्यातल्या त्यात पन्नास वर्ष सत्तेची फळे चाखणारी काँग्रेसी नेते मंडळी अशा विचारापासुन वेगळी बरे कशी राहणार ? याचाच अर्थ असाही होऊ शकतो जनहिताच्या नावाखाली सर्वकाही सत्ताप्राप्तीसाठी असे मार्ग स्विकारुन सर्वसामान्यांना कल्पनेच्या भावनेत गुंतवुन ठेवण्यासाठी भारत जोडो यात्रासारख्या संकल्पनेला सुरुवात झाली. बहुतांशी वाचक व जनतेच्या मनात नक्कीच असे वाटते की, भारत जोडो म्हणण्यामागे भारत नेमका तुटला कुठे, जो जोडण्यासाठी राहुलजींनी अशी योजना राबविली. मुळातच भारत स्वातंत्र्यपुर्व काळापासुन ते आजपर्यंत अखंडच होता, आजही आहे. व तो पुढेही अखंडच राहणार अशा अखंडतेला कोणीह तोडु शकत नाही. म्हणुनच जोडण्याची संकल्पना कशासाठी ?. सरळ सरळ म्हणा ना, आम्ही पन्नास वर्ष सत्तेत होतो आमच्या अविचारीपणामुळे आमची सत्ता गेली, आम्हास सत्तेशिवाय करमत नाही. म्हणुन जनतेच्या डोळ्यात धुळफेक करुन या निमित्ताने भारत जोडो ऐवजी आमच्या पक्षाची खुपच विस्कटलेली घडी दुरुस्त करुन सत्ता हस्तगत करण्याचा हा एक मार्ग आम्ही स्विकारला आहे,"ताकाला जाऊन भांडे लपविण्याचा असा केविलवाणा प्रयत्न का ?" दुसरीकडे या भारत जोडो यात्रेमुळे सर्वच मिडियामार्फत काही नवीन स्लोगन समोर आले. ते असे संविधान बचाव देश बचाव, भारत जोडो नफरत तोडो अशा या गोष्टीचा अर्थाअर्थी कसा बरे संबंध येतो? सर्वसामान्य अविवेकी जनतेच्या डोक्यात वेगळेच काहुर निर्माण करुन आपला उद्देश व हेतु साध्य करण्याचा हा काँग्रेसी फसवा डाव आहे. देशातील महागाई, भ्रष्टाचार, बेरोजगारी, शेतमालाला हमीभाव, आरोग्यव्यवस्था अशा महत्वाच्या प्रश्नावर विरोधकांनी वेळोवेळी राज्यात अथवा केंद्रात शासन कर्त्यावर तुटून पडून जाब विचारला पाहिजे व जनकल्याणकारी योजना राबविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहिले पाहिजे. मागची पन्नास वर्ष काँग्रेसी मंडळी दिर्घकाळ सत्ताधिश असताना अशा योजना प्रामाणिकपणे राबविण्यास्तव का प्रयत्नशिल राहिले नाहीत? जर अशा सर्व जनहितकारी व राष्ट्रहित साधणाऱ्या विषयावर प्रामाणिकपणे सद्सद्विवेकबुद्धीने विचारमंथन करुन अशा सर्व गोष्टी अंमलात आणल्या असत्या तर लोकांनी भाजपला पर्याय म्हणुन स्विकारलेच नसते. आपण चुकायचे आणि आपणच अशा भुलथापा, युक्त्या, क्लृप्त्या काढुन जनतेला मुखर्च बनवाचे हे वर्तमानातील सर्वच भारतीय चांगल्या प्रकारे जाणुन आहेत. शिवाय जात-पात,धर्माधिष्टीत राजकारणामुळे ही संकल्पना याच काँग्रेस मंडळीकडुन उदयास आणल्या गेली व वेळोवेळी देशात दंगे-धोपे घडविण्याचा प्रयत्न जोर धरु लागला. अशा बाबी संविधानारुप नसुन विरोधी आहेत असे काही मंडळीला वाटते पण भारतीय संविधान हे मुळातच धर्म अथवा कोण्या एका विशिष्ट जातीधर्मावर अवलंबुन नसुन ते केवळ देश व भारतीयजनतेच्या हितासाठीच आहे.

मान्य आहे, राहुलजीला भावी पंतप्रधान होण्यासाठी हा सर्व खटाटोप करावा लागत आहे . पण ते तरी या पदासाठी कितपत योग्य आहेत असा सवाल जनता करत आहे. परवाच ही यात्रा महाराष्ट्राच्या बाहेर निघत असताना त्यांनी सावरकराबद्दल जी चिखलफेक केली ती किती टक्के महाराष्ट्रीयन लोकांच्या मणी उतरली याचे उत्तर शंभरटक्के नकारार्थीच असेल. पंतप्रधान पद हे संविधानिक पद असुन देशासाठी ते एक पितृतुल्य पदही आहे, ते सांभाळताना देश व सर्व समाजासह त्या पदाची गरिमा सांभाळावी लागते. उठसुठ कोणाबद्दलही अभ्यासाविना बोलणे अशा गोष्टीमुळे नको त्या गोष्टीला संधी मिळुन धर्मा-धर्मात जातीपातीत तेढ निर्माण होते याचे भान सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांनी संवदेनशील व प्रामाणिकपणे जपणे व सांभाळणे गरजेचे आहे. भारत जोडो यात्रेत महाराष्ट्रातील तमाम जनता राहुल गांधी या व्यक्तीला बघण्यासाठी सहभागी होती त्यांना भावी पंतप्रधान म्हणुन नाही. देश हा एका कुटुंबासारखा असतो, जसे कुटुंबकर्त्याला आपले कुटुंब सुव्यवस्थीत, प्रामाणिक व सुंस्कारीक ठेवण्यासाठी पितृतुल्यत्वाचा दबदबा ठेऊन नेहमीच आचरण करावे लागते तेथे प्रेमापेक्षा कर्तव्याचा अधिक विचार करुन कुटुंब नियंत्रीत ठेवणे गरजेचे असते. अन्यथा "कुटुंबाची अवस्था ना बाप का डर ना मा का डर बच्चे निकले वॉलींटियर " अशीच होऊन बसते याला हिटलरशाही म्हणता येणार नाही. 2024 च्या निवडणुकीत केंद्रस्थानी सत्ता हस्तगत करण्यासाठी काँग्रेस मंडळीनी निश्चितच तयारीला लागले पाहिजे. पण तत्पुर्वी भारतीयासह संविधान व देशहित, देशप्रेमाप्रती सदैव प्रामाणिक राहुन जनसेवेसाठी अधिक कटिबद्ध राहुन आपल्या प्रती सर्व सामान्याच्या मनात कायम आपुलकीची भावना टिकविण्यासाठी प्रयत्नशील असले पाहिजे. ही भारत जोडो यात्रा नव्हे ही तर काँग्रेस जोडो यात्रा असेच या प्रसंगी म्हणावे लागेल. राहुलजीनी महाराष्ट्रातल्या काही भागात पायी चालुन जी काही थोडीबहुत सहानुभूती कमवली होती ती त्यांच्या राष्ट्रपुरुषाबद्दल अविवेकीपणाने बोलल्यामुळे गमावली असे यावरुन स्पष्ट होते.

# शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी सर्वोच्च प्राधान्य

## दुष्काळग्रस्त भागात पुराचे पाणी वळविण्याच्या प्रकल्पाला जागतिक बँकेने अर्थसहाय्य करावे : मुख्यमंत्री

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील मराठवाडा, विदर्भ भागातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी कृषी प्रकल्पांसोबतच दुष्काळग्रस्त भागात पुराचे पाणी वळविण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प राज्य शासनाने तयार केला असून त्यासाठी जागतिक बँकेने अर्थसहाय्य करावे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.

जागतिक बँकेचे भारतातील प्रमुख ऑगस्टे तानो कौमे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. शिष्टमंडळात श्रीमती शबनम सिन्हा, आदर्श कुमार, सुदीप मोजुमदार, झियांग वाँग सदस्यांसमवेत निवृत्त सनदी अधिकारी प्रविण परदेशी, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, कौशल्य विकास विभागाच्या प्रधान सचिव मनिषा वर्मा, बेस्टचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता, कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे प्रकल्प संचालक परिमल सिंग आदी यावेळी उपस्थित होते. आज झालेल्या बैठकीत महाराष्ट्र कौशल्य विकास प्रकल्प, हवामान बदल आणि त्यामुळे कृषी क्षेत्रावर होणारा परिणाम, बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन स्मार्ट प्रकल्प, बेस्टसाठी इलेक्ट्रीक बसेस याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले, जागतिक बँकेच्या अर्थसहाय्यातून महाराष्ट्रात कौशल्य विकास कामे सुरू असून त्याद्वारे क्षमता बांधणीस मदत होत आहे. भविष्यातही अशाचप्रकारे



राज्यातील विविध क्षेत्रातील प्रकल्पांना सहकार्य करण्याचे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले. राज्यातील कृषी क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी राज्य शासनामार्फत सुरू असलेल्या विविध योजनांपैकी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत (पोक्रा) मराठवाडा आणि विदर्भातील सुमारे ५००० गावांना फायदा होत आहे. या प्रकल्पाला जागतिक बँकेचे सहाय्य लाभले असून प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याच्या यशस्वीतेनंतर दुसऱ्या टप्प्यास मान्यता देण्याचे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. पश्चिम महाराष्ट्रातील पुराचे पाणी दुष्काळग्रस्त भागात वळविण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प राज्य शासनाने हाती घेतला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून पिण्याच्या पाणी तसेच लाखो हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्यात येणार आहे. यामुळे शेतीला फायदा होणार असून त्यामुळे शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी प्रयत्न केला जाणार आहे. याप्रकल्पासाठी जागतिक बँकेने सहकार्य करावे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी अपर मुख्य सचिव कपूर, प्रधान सचिव श्रीमती वर्मा, गुप्ता, डवले यांनी आपापल्या विभागाच्या प्रकल्पांविषयी माहिती दिली.



# सामान्य कुटुंबातील मुलगी बनली विक्रीकर निरीक्षक

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** ताजनापूर तालुका खुलताबाद येथील कविता तेजराव काळे ही MPSC मार्फत STI (राज्य कर निरीक्षक) पदी निवड झाल्याबद्दल तिचा ताजनापूर च्या गावकऱ्यांनी गावातून मिरवणूक काढून भव्य दिव्य सत्कार केला. विशेष म्हणजे कविताच्या आई बिजला बाई काळे ह्या अंगणवाडी मदतनीस असून कविता च्या वडिलांचे 17 वर्षा पूर्वी निधन झाले आहे. अतिशय कठीण परिस्थितीत आई ने तिन्ही मुलांना उच्च शिक्षण देऊन दुसरी मुलगी पूजा PSI MAINS उत्तीर्ण झाली आहे. या प्रसंगी पंचायत समिती माजी सभापती गणेश नाना आधाने माजी उपसभापती दिनेश भाऊ अंभोरे, माजी जि प सदस्य सुरेश सोनवणे, माजी पंचायत समिती सदस्य प्रकाश बापू चव्हाण शांताराई कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष गणेश काळे पत्रकार सुधाकर जेठे, प्रवीण इंगळे, नंदकिशोर मांडवकर, परमानंद महाराज, सरपंच नेहाबाई काळे, उपसरपंच संजय काळे, चेअरमन संदीप काळे, व्हॉइस चेअरमन अमीर सय्यद मुख्याध्यापक एम. बी. चव्हाण सर, सुरेश चव्हाण सर, विलास चव्हाण सर , आशा तोडकरी मॅडम, शैला कदम मॅडम, प्रज्ञा व्यवहारे मॅडम, विलास साळुंके सर, कल्पना साळुंके मॅडम व समस्त गावकरी उपस्थित होते. या सत्कार सोहळाचे आयोजन रावसाहेब देशमुख, दीपक काळे, अंकुश काळे, गणेश काळे, प्रवीण काळे व स्वप्निल काळे व समस्त गावकऱ्यांनी केले. सूत्रसंचालन सुरेश चव्हाण सर यांनी केले.

# जाधव हॉस्पिटलचा अनोखा उपक्रम; नेत्रसेवा आपल्या दारी

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरात लायन्स क्लब ऑफ औरंगाबाद चिकलठाणा व जाधव हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमानाने आज नेत्रसेवा आपल्या दारी ह्या मोहिमे अंतर्गत कन्नड येथे जाधव नर्सिंग होम अँड आयसीयू सेंटर येथे आज रुग्णांचे नेत्र तपासणी शिबिर संपन्न झाली.

या शिबिराचा उद्घाटन डॉ एस जे जाधव, अध्यक्ष छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान, यांच्या शुभ हस्ते संपन्न झालं. याप्रसंगी डॉ. रविराज जाधव डॉ सदाशिव पाटील डॉ सचिन यादव डॉ विलास पाटील उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ जाधव म्हणले की दर बुधवारी सकाळी दहा पासुन दुपारी दोन वाजेपर्यंत सदरील शिबिर मोफत या ठिकाणी होणार आहे तरी तालुक्यातील तसेच शहरातील गरजू रुग्णांनी याचा लाभ घ्यावा असा आव्हान त्यांनी केलं वयानुसार होणारे दृष्टीदोष, डायबेटिक रिटर्नोपॅथी , डोळ्यातील तिरळेपणा, मोतीबिंदू, काच बिंदू, यावर अत्याधुनिक मशीन द्वारे मोफत तपासणी शिबिर व मार्गदर्शन या ठिकाणी होणार आहे. आवश्यकता पडल्यास काही रुग्णांचे मोफत ऑपरेशन सुद्धा लायन्स क्लब ऑफ चिकलठाणा शाखेचे वतीने औरंगाबाद येथे होईल. तरी कन्नड तालुक्यातील व शहरातील जास्तीत जास्त लोकांनी याचा लाभ घ्यावा असे आव्हान डॉ एस जे जाधव यांनी केले. आज दिवसभरात शिबिरामध्ये जवळपास 60 रूग्नानी नेत्र तपासण्यात आले या शिबिर साठी लायन्स क्लब ऑफ चिकलठाणा चे प्रकल्प समन्वयक विनोद हरकुट, उत्कर्ष वैद्य, सविता शेजवळ, संदेश रोडे, अक्षय ठाकर, यांनी आज रुग्णांची तपासणी केली.

हे शिबिर यशस्वी होण्यासाठी डॉ विलास पाटील, सचिन गिरे, डॉ युगंधर सोमवंशी, कोळगे पाटील, रूपाली काटकर सिस्टर, बापू तळोदे बिल्डर, विकास खाजेकर, दौलत राठोड, आकाश पवार, राज ठाकूर, लखन चव्हाण, अक्षय घुगे, शिवराज तेली. यांनी परिश्रम घेतले.



# पै. कल्याण गरुड विशेष कार्य गौरव पुरस्काराने सन्मानित

## सामाजिक कार्याची दखल; राजकीय, धार्मिक, सामाजिक, क्रीडा क्षेत्रात मोलाचे योगदान

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** समाजासाठी विविध क्षेत्रात अविरतपणे झटणाऱ्या मान्यवरांची विशेष कार्य गौरव पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. त्यात कुस्ती क्षेत्रासह समाज हिताकरिता उल्लेखनीय कामगिरी करणारे धुळे तालुका तालीम संघाचे अध्यक्ष मा. श्री कल्याण गरुड यांना विशेष कार्य गौरव पुरस्कार 2022 देऊन त्यांना सन्मानपूर्वक गौरवण्यात आले आहे. सदर हा पुरस्कार मालेगाव येथे विरांगना झलकारी बाई कोळी स्त्री शक्ती सामाजिक संस्था यांच्या वतीने देण्यात आला आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल कल्याण गरुड यांचे सर्वत्र स्तरावरून कौतुकही व्यक्त केले जात आहे. राजकीय, धार्मिक, सामाजिक विशेष करून क्रीडा क्षेत्रात कल्याण गरुड यांचे कार्य मोलाचे आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत धुळ्यातील प्रतिष्ठित नागरिकांच्या वतीने त्यांना तालीम संघाच्या धुळे तालुका अध्यक्ष पदाची जबाबदारी ही सोपवण्यात आली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली धुळे शहरातील भव्यदिव्य असं कुस्ती क्षेत्रातलं वैभव असलेलं जवाहर स्टेडियम या ठिकाणी कुस्त्यांची दंगल घडवली या माध्यमातून अनेक कुस्तीप्रेमींनी राज्यभरात आपले नाव गाजवले. पुन्हा एकदा धुळे शहराला महाराष्ट्र राज्यात कुस्तीची पंढरी म्हणून ओळख निर्माण झाली व त्यात महत्त्वाचे श्रेय जिल्हा तालुका तालीम संघाचे अध्यक्ष कल्याण गरुड यांना जाते. दुरावस्थेत असलेल्या जवाहर स्टेडियमची सुधारणा करून आज अनेक मल्ल त्यात सराव करू लागले आहेत. त्या पाठोपाठच कोरोना सारख्या महामारी मध्ये जीवाची परवा न करता गोरगरिबांना अन्नदान वाटप केले त्याचप्रकारे मतिमंद निवासी शाळेत चिमुकल्यांवर प्रेम करत मायेने घास भरवण्याचे काम पैलवान कल्याण



गरुड यांनी केले. त्यांच्या एक ना अनेक सामाजिक उल्लेखनीय कार्याची दखल घेत विरंगना झलकारी बाई कोळी श्री शक्ती सामाजिक संस्थेच्या वतीने त्यांना विशेष कार्य गौरव पुरस्कार 2022 संस्थेच्या अध्यक्षा गीतांजली कोळी यांच्यासह प्रतिष्ठित मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविले. या पुरस्काराबद्दल पै. कल्याण गरुड यांनी आयोजक सामाजिक कार्यकर्त्या गीतांजली कोळी यांच्यासह प्रमुख अतिथींचे आभार मानले.



# पिंपळनेर येथे रास्ता रोकोला यश; कामे मार्गी लावण्याचे आश्वासन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पिंपळनेर येथील राष्ट्रीय महामार्ग अक्षरश : खड्ड्यात हरवला आहे. पिंपळनेराहून ताहराबादकडे जाणाऱ्या दुरावस्थेबद्दल वेळोवेळी आवाज उठविण्यात आला. परंतु, झोपलेले प्रशासन जागे झाले नाही. परिणामी, आज पिंपळनेरवासियांनी एकाचवेळी अनेक ठिकाणी महामार्ग अडवत ऐतिहासिक रास्ता रोको केला. विशेष म्हणजे मोठ्या संख्येने जनता स्वच्छेने आंदोलनात सहभागी झाली. या आंदोलनामुळे सरकारी यंत्रणा चांगलीच हादरली. यावेळी एमएमआरडीएचे उपविभागीय अभियंता वानखेडे, तहसीलदार प्रवीण चव्हाण आणि लोकप्रतिनिधींनी घेतलेल्या तातडीच्या बैठकीत दोन दिवसांत क्राँकीटीकरणाला सुरुवात होणार असल्याचा निर्णय झाला . तसे ठोस लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलनाची दुपारी १२.वाजता सांगता करण्यात आली . तेव्हा महामार्गावरील वाहतूक सुरळीत सुरु झाली . पिंपळनेर शहरातून जाणारा ७५२ - जी या राष्ट्रीय महामार्गाची अवस्था खूपच बिकट झाली आहे. महामार्गाचे काम रखडल्यामुळे रस्त्यांवरून जाताना प्रचंड धूळ उडते. अडचणींचा सामना करावा लागतो. खराब रस्त्यामुळे अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. यासंदर्भात नागरिकांनी वेळावेळी तक्रारी केल्यात ; तरीही कानाडोळा होत असल्याने पिंपळनेरकरांनी बेमुदत महामार्ग बंद आंदोलनाची हाक दिली. सकाळी १० वाजेपासूनच आंदोलनाला सुरवात झाली. शहरातील पिंपळेनर चौफुली, बस स्टॅण्ड, सामोडा चौफुली आणि जे. टी. चौक रस्त्यावर आंदोलनकर्त्यांनी रस्ता अडवून धरला. यावेळी जोरदार घोषणाबाजीही करण्यात आली. आंदोलनस्थळी दरम्यान, एपीआय सचिन साळुंखे हे फौजफाट्यासह हजर होते . पोलिसांनी आंदोलकांना समजविण्याचा आटोकाट प्रयत्न केला, मात्र आंदोलनावर जनता ठाम दिसून आली . त्यामुळे नाशिक एमएमआरडीएचे अधिकारी , तहसीलदार आणि आंदोलनकर्त्यांच्या प्रतिनिधींची तातडीची एक बैठक ग्रामपंचायतच्या कार्यालयात पार पडली . तीत रस्त्याचे काम रखडण्याची कारणे एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी सांगितलीत . शिवाय , येत्या दोन दिवसांत दीड किलोमीटरच्या पट्ट्याचे क्राँकीटीकरण करण्यात येणार असल्याचा विश्वास आंदोलनकर्त्यांना देण्यात आला.



# एल. जी. गायकवाड यांची निवड


आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** भारतीय जनता पार्टी, संभाजीनगर ग्रामीण जिल्हा कार्यकारणी आज दिनांक 19 नोव्हेंबर 2022, शनिवार रोजी जाहिर करण्यात आली. भाजपा जिल्हा संयोजक पंचायतराज व ग्रामविकास विभाग (ग्रा) पदी एल जी गायकवाड़ यांची निवड झाली असून निवडीचे पत्र शिवप्रकाश(राष्ट्रीय सह संघटन मंत्री), संजयजी कौडगे (मराठवाडा विभाग संघटन मंत्री) यांच्या हस्ते एल. जी. गायकवाड़ यांना देण्यात आले. याप्रसंगी अतुलजी सावे (सहकार मंत्री), विजयाताई रहाटकर, मंत्री बबनरावजी लोणीकर,आमदार संतोषजी दानवे, विजयजी औताड़े (जिल्हाअध्यक्ष, भाजपा, संभाजीनगर), इद्रिस मुलतानी (प्रदेश चिटणीस), सुरेशजी बनकर, सौ.अनुराधाताई चव्हाण (महिला बालकल्याण सभापति), दिनेशजी परदेशी (जिल्हा संघटन सरचिटणीस) लक्ष्मण औटे (जिल्हा संगठन सरचिटणीस) व कोअर कमिटीचे सन्मानिय सदस्य उपस्थीत होते.

# मानवी व पृथ्वीच्या आरोग्यासाठी शाकाहार हाच पर्याय : डॉ. गंगवाल

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** शाकाहार सर्वोत्तम व आरोग्यदायी आहे. निरोगी



जीवनासाठी शाकाहाराचा अंगीकार करून मांसाहाराचा पूर्णतः त्याग करावा, तसेच प्राण्यांनाही जगण्याचा अधिकार द्यावा, असे आवाहन सर्वजीव मंगल प्रतिष्ठानचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. कल्याण गंगवाल पत्रकार परिषदेत केले. डॉ. कल्याण गंगवाल म्हणाले, साधू वासवानी यांचा जन्मदिवस १९८६ पासून २५ नोव्हेंबर हा दिवस 'मीट्लेस डे' अर्थात विश्व शाकाहार दिवस व प्राणी हक्क दिवस म्हणून साजरा होत आहे. या दिवसाची संकल्पना 'स्टॉप ऑल किलिंग' अशी आहे. शाकाहाराचा आणि अहिंसेचा संदेश देण्याचा दिवस म्हणून याचे महत्व आहे. या दिवसाच्या निमित्ताने आपण सर्वांनी शाकाहार अंगीकारून मांसाहार त्याग करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन करतो. शाकाहाराची चळवळ व्यापक होत आहे. कोरोना नंतर अनेक देशांनी शाकाहाराकडे वळण्यास सुरुवात केली आहे. चीनमध्ये १५ टक्के लोकांनी शाकाहाराचा अंगीकार केला आहे. आरोग्यासाठी शाकाहाराचे महत्व लोकांच्या लक्षात येत आहे. हृदयरोग व कर्करोग यांसारख्या गंभीर आजारांना मांसाहार कारणीभूत असल्याचे विश्वमान्य झाले आहे. त्यामुळे मानवी व पृथ्वीचे आरोग्य उत्तम राहण्यासाठी शाकाहार गरजेचा आहे. न्यूझीलंड, जर्मनी, डेन्मार्क व अन्य अनेक देशांत शाकाहार चळवळ मोठ्या प्रमाणात राबवली जात आहे. जर्मनीमध्ये शाही भोजन शाकाहारी असते, तर ऍम्स्टरडॅममध्ये मांसाहाराची जाहिरात निषिद्ध आहे. पर्यावरण संवर्धन व ग्लोबल वॉर्मिंग कमी करण्यासाठी देखील शाकाहार महत्वाचा आहे.

# औरंगाबाद ग्रंथोत्सव २०२२चे आयोजन; दोन दिवस भरगच्च कार्यक्रमांची मांदियाळी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय औरंगाबाद यांचे संयुक्त विद्यमाने शनिवारी दि.२६ व रविवार दि.२७ नोव्हेंबर रोजी औरंगाबादेत भव्य ग्रंथोत्सव २०२२चे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथविक्री व विविध भरगच्च कार्यक्रम होणार आहेत. या ग्रंथोत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन औरंगाबाद ग्रंथोत्सव समन्वय समितीच्या वतीने करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांच्या विद्यमाने दि. 26 व 27 नोव्हेंबर 2022 रोजी शासकीय विभागीय ग्रंथालय परिसर समर्थ नगर येथे औरंगाबाद ग्रंथोत्सव 2022 चे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथ विक्री अण्णाभाऊ साठे व जी. ए. कुलकर्णी ग्रंथ दालन तसेच विविध कार्यक्रमासाठी कवियित्री शांताबाई शेळके, शंकर रमाणी व्यासपीठ व वसंत बापट प्रेक्षागृह उभारण्यात आले आहे.

या ग्रंथोत्सवाचे उद्घाटन शनिवार, दि. २६ नोव्हेंबर २०२२ सकाळी १०.३० वाजता ज्येष्ठ साहित्यिक, समिक्षक डॉक्टर सुधीर रसाळ यांच्या हस्ते होणार आहे.यावेळी विशेष अतिथी म्हणून केंद्रीय राज्यमंत्री, रावसाहेब पाटील दानवे, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री. डॉ. भागवत कराड तर अध्यक्षस्थानी राज्याचे रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री तथा औरंगाबाद जिल्ह्याचे पालकमंत्री संदिपान पाटील भुमरे, कृषिमंत्री अब्दुल सत्तार, सहकार मंत्री अतुल सावे, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे आदी उपस्थित राहणार आहेत.प्रमुख पाहुणे म्हणून खासदार सय्यद इम्तियाज जलील, आमदार सतीश चव्हाण, आमदार विक्रम काळे,आमदार हरिभाऊ बागडे, आमदार संजय शिरसाट,आ. प्रशांत बंब,आ.प्रदिप जैस्वाल, आ.उदयसिंग राजपुत, आ.रमेश बोरनारे, जिल्हाधिकारी आस्तिक कुमार पांडेय ,डॉ. उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर, ग्रंथालय संचालक दत्तात्रेय क्षीरसागर महाराष्ट्र राज्य, सुनील हुसे सहाय्यक ग्रंथालय संचालक, औरंगाबाद, सुभाष मुंढे ग्रंथपाल शासकीय विभागीय ग्रंथालय, औरंगाबाद. गुलाबराव मगर कार्यवाह, जिल्हा ग्रंथालय संघ, औरंगाबाद. ग्रंथोत्सवाच्या पहिल्या दिवशी शनिवारी सकाळी नऊ वाजता ग्रंथ दिंडी क्रांती चौक ते कार्यक्रम स्थळ पर्यंत निघणार आहे. यावेळी प्रमुख उपस्थिती अनंत गव्हाणे, अप्पर जिल्हाधिकारी, औरंगाबाद, एम.के. देशमुख, शिक्षणाधिकारी (माध्य.) औरंगाबाद, एस. एन. साबळे, उपसंचालक, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, औरंगाबाद, सकाळी १०.३० वा. उद्घाटन होणार आहे. यावेळी संविधान दिनानिमित्त संविधान उद्देशिका



सामुहिक वाचन होईल. दुपारी दोन वाजता परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. वाचक बहुसंख्य पर्यायात हरवत चालला आहे. यावर परिसंवाद होईल. या परिसराच्या अध्यक्षस्थानी डॉ. रा. शं. बालेकर असून सहभागः-डॉ. रमेश रावळकर, डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र काळुंखे, डॉ. महेश खरात, डॉ. समिता जाधव. सायं. ५.०० वा. हास्यरंग थोडं बसा आणि भरपूर हसा. सादरकर्ते ःहास्य कवि प्रा. डॉ. विष्णु सुरासे(मराठवाडा एक्सप्रेस) हे आहेत. औरंगाबाद ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी रविवार, दि. २७ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता.परिसंवाद विषयः-भारतीय आणि मराठवाडा स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व लोकशाहीचे भवितव्य. अध्यक्षः- डॉ. ऋषिकेश कांबळे, ज्येष्ठ साहित्यिक व समिक्षक,सहभागः- डॉ. कैलास अंभुरे, डॉ. अनिरूध्द मोरे, डॉ. इकबाल मित्रे. दुपारी २.०० वाजता काव्यवाचन : अध्यक्षः- अभय दाणी,सहभाग :- श्रीमती आशा डांगे, श्रीमती ज्योती सोनवणे, श्रीमती माधुरी चौधरी, पंजाबराव मोरे, भास्कर पाटील, सुनिल उबाळे, सुदाम मगर, हबीब भंडारे, श्रीमती प्रिया धारूरकर, रंजन कंधारकर ,सुत्रसंचलन : निलेश चव्हाण. ग्रंथ प्रदर्शन व विक्री सकाळी दहा ते रात्री नऊ वाजेपर्यंत राहणार आहे. या ग्रंथोत्सवाचा समारोप दुपारी ४.वाजता होणार आहे. यावेळी डॉ. दादा गोरे, विनोद कुलकर्णी, सहाय्यक आयुक्त, मानव विकास आयुक्तालय, औरंगाबाद. मुकुंद चिलवंत, सुनील हुसे, सहाय्यक ग्रंथालय संचालक, औरंगाबाद विभाग, सुभाष मुंडे, ग्रंथपाल, शासकीय विभागीय ग्रंथालय, औरंगाबाद. कुंडलिक अतकरे, कोषाध्यक्ष, म.सा.प., औरंगाबाद यांच्या उपस्थितीत होणार आहे. औरंगाबाद ग्रंथोत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समन्वय समितीचे अध्यक्ष औरंगाबाद जिल्हाधिकारी अस्तिक कुमार पाण्डेय, सदस्य एम. के. देशमुख, दादा गोरे, मुकुंद चिलवंत, कुंडलिक कातकरे, गुलाबराव मगर , जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे, यांनी केले आहे.

# डोंगरथडी ते गंगथडी काँग्रेसची पीक विमा मिळावा या मागणीसाठी स्वाक्षरी मोहीम

## युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष संतोष सूर्यवंशी यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** यावर्षी मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन



देखील पीक विमा कंपनीने शेतकऱ्यांना विमा मंजूर केलेला नाही. पीक विमा सरसकट मंजूर करून हेक्टरी नुकसान भरपाई देण्यात यावी या मागणीसाठी वैजापूर तालुक्यातील डोंगरथडी भाग ते थेट गणथडी पर्यंत सर्व गावातील शेतकऱ्यांच्या स्वाक्षरी मोहीम राबवून विमा कंपनी, जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना जिल्हाध्यक्ष कल्याण काळे, तालुकाध्यक्ष प्रशांत सदाफळ यांच्या मार्गदर्शनखाली निवेदन देणार असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संतोष सूर्यवंशी यांनी दिली आहे. शेतकरी आत्महत्या वाढत आहे या वर्षी कापूस, मक्का, सोयाबीन पिकांचे हेक्टरी उत्पादन घटले आहे असे असताना शेतकर्‍यांनी पोटाला चिमटा घेऊन पीक विमा भरला मात्र शेतकर्‍यांच्या तोंडाला पाने पुसण्याचा डाव सुरू आहे. लोक प्रतिनिधी याकडे लक्ष देण्यास तयार नाही. या शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्नावर आवाज उठवण्यासाठी काँग्रेस पक्ष प्रत्येक गावात जावून आंदोलनाचे रणशिंग फुंकले जाणार आहे . ज्या शेतकर्‍यांनी विमा कंपनीला नुकसान झाल्याची तक्रार केली अश्या शेतकऱ्यांनाच विमा मिळणार अश्या बातम्या येत आहेत वास्तविक गाव गाड्यातील शेतकर्‍यांना याबाबत कल्पना प्रशासनाने दिली नाही पीक विमा भरण्याबाबत जशी जनजागृती प्रशासनाने केली तशीच जनजागृती तक्रारी बाबत केली नाही.यामुळे हजारो शेतकरी हक्काच्या पीक विमा पासून वंचित राहण्याचा धोका निर्माण झाला आहे म्हणून ही मोहीम राबविण्यात येत असून या मोहिमेत महाविकास आघाडीतील मित्र पक्ष म्हणुन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आणी राष्ट्रवादी काँग्रेस यांनी देखील सहभागी व्हावे असे आवाहन संतोष सुर्यवंशी यांनी केले आहे.

# बेघर करू नका, नोटीसा मागे घेऊन घरे नियमानुकूल करा

## सामोडे (घोड्यामाळ) येथील कुटुंबीयांची धुळ्यात निदर्शने

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** साक्री तालुक्यातील मौजे सामोडे (घोड्यामाळ) येथील गट क्र ९ ४७ जागेवरील अतिक्रमणधारकांना बेघर करू नये. दिलेल्या नोटीस मागे घेवून ही घरे नियमाकुल करावीत, अशी मागणी आज एकलव्य आदिवसी युवा संघटने सह स्थानिक रहिवाश्यांनी केली आहे . संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजकुमार सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाप्रशासनाला निवेदन देण्यात आले. त्यानंतर जिल्हाधिकारी व प्रांताधिकारी कार्यालय आवारात निदर्शन करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, मौजे सामोडे येथील गट क्र. ९ ४७ येथील रहिवासी आदिवासी बांधव व इतर समाज ३० ते ३५ वर्षांपासून राहत आहे. सामोडे ग्रामपंचायतीने १० दिवसाच्या आत जागा खाली करण्याच्या नोटीसा दिलेल्या आहेत. तेथील ४७७ कुटुंब मोलमजुरी करून कुटुंबाचे पालनपोषण करून आपली उपजिवीका भागवतात. त्यातील काही कुटुंब नियमाकुल झाले आहे. काही कुटुंबावर त्याच जागेवर शासकीय घरकुलाचा देखील लाभ झालेला आहे. ते घरकुल त्या जागेवर बांधण्यात आले आहे. अनेक कुटुंब घरपट्टी पाणीपट्टी व इतर कर ही भरत आहेत. शासनाने जर त्यांना त्या जागेवरून हटविले तर मोठा अन्याय होणार आहे. त्यांचे कुटुंब उध्वस्त होतील. तरी शासनाने या नोटीसाबाबत फेरविचार करावा व त्यांची घरे नियमानुकूल करावे. तसेच राज्य सरकारने गायरान जमिनीबाबत स्थगिती देऊन सर्वोच्च न्यायालयात फेरविचार याचिका दाखल करून आदिवासी व इतर समाज बांधवांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे अन्यथा संघटना तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे यावेळी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजकुमार सोनवणे, सचिव ईश्वर गायकवाड, दिलीप माळी विनायक पिंपळसे, विजय मालुसरे, अंकुश सोनवणे कन्हैय्या माळी, भगवान मालचे आदींसह रहिवासी उपस्थित होते.




# वीज कर्मचाऱ्याला मारहाण करणाऱ्या आरोपीस तीन वर्षे सश्रम कारावास

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** वीजबिल वसुलीसाठी गेलेले महावितरणच्या कर्मचाऱ्याना मारहाण करून शिवीगाळ केल्या प्रकरणातील आरोपीला दोषी ठरवत अमरावती जिल्हा व सत्र न्यायालयाने दंड व तीन वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. अमरावती येथील विश्वनाथ कॉलनीमध्ये राहणारे गणेश बळीराम तळोकार (५२) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव असुन ही घटना ऑक्टोबर २०१८ मध्ये अमरावतीतील फरशी स्टॉपस्थित टांक बाजार परिसरात घडली होती. दि.१० ऑक्टोबर २०१८ रोजी राजापेठस्थित वीज वितरण कंपनीच्या कार्यालयातील वरिष्ठ तंत्रज्ञ गोपाल काशीराम माहुलकर हे थकीत वीजबिल वसुलीचे काम करत होते. दरम्यान, ते टांक बाजार येथे प्रकाश बळीराम तळोकार यांच्या दुकानात वीजबिल थकल्याने वसुलीकरिता गेले असता, तेथे उपस्थित प्रकाश तळोकार यांचा भाऊ आरोपी गणेश तळोकार यांना तुम्ही वीजबिल भरले नाही तर तुमचे वीज कनेक्शन बंद करण्यात येईल असे म्हटले. त्यावेळी गणेश तळोकार यांनी वाद घालून गोपाल माहुलकर यांना अश्लील शिवीगाळ केली आणि लोखंडी पाईपने मारण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यानंतर त्याने माहुलकर यांना थापड मारून त्यांची कॉलर पकडली. घटनेनंतर माहुलकर हे जखमी झाले आणि घटनेची तक्रार राजापेठ पोलीस ठाण्यात दिल्यानंतर पोलिसांनी आरोपी विरुद्ध कलम ३५३,३३२,,५०४ आणि १८६ भां.द.वि.नुसार गुन्ह्याची नोंद केली होती. तपासाअंति तपास अधिकारी पोलिस निरिक्षक दत्ता नरवाडे यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. या प्रकरणात सरकारी पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकील रंजीत ना.भेटाळू यांनी युक्तिवाद करत न्यायालयात एकूण सात साक्षीदार तपासले. दोन्ही पक्षाच्या युक्तीवादानंतर जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रमांक ३ मा. रवींद्र व्ही. ताम्हाणेकर यांच्या न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत भां.द.वि.च्या कलम ३५३ नुसार दोन वर्षे सश्रम कारावास व दोन हजार रुपये दंड व दंड न भरल्यास एक महिना अतिरिक्त कारावास,तसेच कलम ३३२ भां.द.वि. नुसार ३ वर्ष सश्रम कारावास व ३ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास दोन महिने अतिरिक्त कारावास व कलम १८६ भां.द.वि. नुसार ३ महिने सश्रम कारावास व ५०० रुपये दंड व दंड न भरल्यास सात दिवस अतिरिक्त कारावासाची शिक्षा ठोठावली. सदर प्रकरणात पैरवी अधिकारी म्हणून हवालदार बाबाराव मेश्राम व एनपीसी अरुण हटवार , सतीश चौधरी यांनी पोलीस विभागाकडून काम पाहिले.




# योगिता शास्त्री उद्यम हिरकणी पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** औद्योगिक प्रशिक्षण संस्था औरंगाबाद येथील सभागृहात उद्यम इन्फो. सोल्युशन प्रा.ली. या संस्थेतर्फे राज्यस्तरीय उद्यम हिरकणी पुरस्काराचे वितरण समारंभ पार पडला. "लीला विजय एज्युकेशन सोसायटीच्या संचालिका योगिता सुधीर शास्त्री यांना हा उद्यम हिरकणी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सदर पुरस्कारासाठी राज्यभरातुन नामांकने प्राप्त झाली होती. सदर पुरस्कार वितरणासाठी राज्याचे उद्योग विभागाचे सहसंचालक बी.टी.यशवंते साहेब, उद्यम इन्फो. सोल्युशन प्रा. ली.चे संचालक उल्हास भाले, नागपुर, सोलापूर, उस्मानाबाद, जालना, औरंगाबाद व इतर जिल्ह्यांतील पुरस्कार प्राप्त उद्योजिका व त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

योगिता सुधीर शास्त्री यांना हा उद्यम हिरकणी पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# सत्य बोलणाऱ्याला सन्मान मिळतो




आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** लक्षपूर्वक ऐकणे, वाचलेले विचारात उतरवणे आणि विचारपूर्वक बोलणे हा वक्तृत्वाचा पाया असून कमी महत्वाचे पण सत्य बोलणाऱ्याला सर्वत्र सन्मान मिळतो असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.शिरीष लांडगे यांनी केले. येथील भारदे साक्षरता प्रसारक मंडळाने पद्मभूषण बाळासाहेब भारदे यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित राज्यस्तरीय शालेय स्मृती करंडक वक्तृत्व स्पर्धेच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रमेश भारदे होते. यावेळी बोलताना डॉ.लांडगे म्हणाले की महाराष्ट्राला आचार्य अत्रे, प्रा.शिवाजीराव भोसले, राम शेवाळकर अशी मोठी वक्तृत्व परंपरा असून याच परंपरेतील एक श्रेष्ठ नाव म्हणजे कै. भारदे होते त्याच्या नावाने ही स्पर्धा असणे अत्यंत मोलाचे ठरते. यावेळी श्यामराव भारदे, हरिष भारदे,एजाज काझी यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्पर्धेचा मानाचा कै. बाळासाहेब भारदे स्मृती करंडक शेवगावच्या आबासाहेब काकडे विद्यालयाच्या संघाने पटकावला तर स्पर्धेच्या लहान गटात ऋग्वेद सरोदे( पुणे) याने प्रथम, सानवी देशपांडे( औरंगाबाद) हिने द्वितीय तर खराडे आर्या( राहुरी)हिने तृतीय क्रमांक पटकावला सिसोदिया अर्णव( सुकळी) कार्तिकी म्हस्के( वरूर) व ओम पाटील( शिरूर)यांनी उत्तेजनार्थ पारितोषिके मिळवली तर मोठ्या गटात आदित्य टेकाळे( बीड) याने प्रथम, राधिका खांबट हिने द्वितीय तर ज्ञानेश्वरी झिरपे हिने तृतीय क्रमांक मिळवला.वैष्णवी तळवे, किशोर शेळके, ओंकार दारकुंडे यांनी उत्तेजनार्थ पारितोषिके प्राप्त केली. लहान गटाचे परीक्षण गौरी जोशी, विठठल सोनावणे, तुकाराम जाधव यांनी तर मोठ्या गटाचे परीक्षण अतुल कुलकर्णी कृष्णा बेलगावकर व हरिभाऊ नजन यांनी केले. स्पर्धेचे उदघाटन श्री.एस व्ही कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. स्पर्धेस बीड, औरंगाबाद,पुणे शिरूर, राहुरी,पाथर्डी, नगर ,श्रीरामपूर संगमनेर शेवगाव येथील स्पर्धकांचा मोठा सहभाग लाभला.




# ३ व ४ डिसेंबर रोजी प्रसिद्ध शायर, गीतकार हसन कमाल यांच्या हस्ते कॉ. अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलनाचे उद्घाटन

## औरंगाबादकरांना भरगच्च साहित्यिक मेजवानी

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** येथे दिनांक ३ आणि ४ डिसेंबर रोजी स्वातंत्र्यसेनानी मनोहरराव टाकसाळ साहित्य नगरी, शायर बशर नवाज सभागृह, तापडिया नाट्यगृह येथे आयोजित करण्यात आलेल्या ११व्या कॉ. अण्णा भाऊ साठे राज्यस्तरीय साहित्य संमेलनाचे उद्घाटक म्हणून ज्येष्ठ उर्दू शायर, गीतकार, पत्रकार तथा स्तंभलेखक हसन कमाल यांना निमंत्रित करण्यात आले आहे. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ते एक प्रगतिशील लेखक असून पुरोगामी आणि परिवर्तनाचा विचार मांडणारी त्यांची लेखणी सतत चर्चेत राहत आलेली आहे. १९८५ मध्ये त्यांना "आज की आवाज" या चित्रपटातील गाण्यासाठी फिल्मफेअर पुरस्कार मिळाला आहे. त्यांनी निकाह, मजदूर, इन्साफ कौन करेगा, आज की आवाज, तवायफ, किरायदार, कसम सुहाग की, अन्वर, खेला या बहुचर्चित सिनेमांसाठी गीत लेखन केलेले आहे. "दिल की ये आरज़ू थी" "फ़ज़ा भी है जवां" "बीते हुवे लम्हों की कसक" "दिल के अरमां आंसुओं में बह गये" "चेहरा छुपा लिया है" "बात अधूरी क्यों है"



"हम मेहनत कश इस दुनिया से" "मेहरबानों को मेरा सलाम आखरी" "हथकडियां पहनाऊंगी" "इकरार करे किस से" "इनकार करे किस को" "तुझे देखे बिना दिल नहीं माने" "इनसाफ़ करेगा" "आज की आवाज़ जाग अय इनसान" "भारत तो है आज़ाद, हम आज़ाद कब कहलायेंगे" "जोबन अनमोल बालमा" "मेरा शोहर" "आज की शाम, आप के नाम" "तेरे प्यार की तमन्ना" "बहुत देर से दर पे आंखें लगी थीं, हुज़ूर आते आते बहुत देर करदी" , "अक्कड बक्कड बांबे बो" "चारों तरफ़ प्यार है" "गा रहा है दिल यही गीत बार बार" "दिल लिया, दिल दिया, आदी लोकप्रिय गीतांचे लेखन केले आहे. "लौट आये वो" आणि "तवायफ" या सिनेमांसाठी त्यांना फिल्मफेअरचे नामांकनही मिळाले होते. त्यांना उत्तरप्रदेशचा नेहरू कल्चरल असोसिएशन पुरस्कार, उत्तरप्रदेशचा हिन्दी उर्दू साहित्य पुरस्कार, फ़िल्म पुरस्कार ,आशीर्वाद सम्मान, सुर सिंगार, डॉ.वी.डी.अरोरा पुरस्कार, (फिल्म निकाहसाठी) 'अवाम' आणि 'तेरे पायल मेरे गीत' साठी अरुण-अमीन पुरस्कार, मशहूर गीतकार पुरस्कार, मौलाना अबुल कलाम आज़ाद पुरस्कार,असे मानाचे पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. हसन कमाल यांचा जन्म लखनऊ येथे झालेला आहे. लखनऊ विद्यापीठातून त्यांनी पदवीचे शिक्षण घेतले. पत्रकार, संपादक म्हणून ब्लिट्ज़ विक्ली पासून १९६५ मध्ये सुरूवात झाली. त्यानंतर ते ब्लिट्ज़ चे संपादक झाले. उर्दू वार्ता पत्रिका, इंन्किलाब, रोज़नामा साहारा, आदींचे ते नामांकित स्तंभलेखक होते. त्यांचे स्तंभलेखन तमिळ, तेलुगु, मराठी आणि इंग्रजी भाषांमध्ये अनुवादित झालेले आहे. हसन कमाल उर्दूचे सुप्रसिद्ध शायर आहेत. चित्रपट, टी.वी. साठी त्यांनी स्क्रीन प्ले आणि गीतलेखन केले आहे.अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मुशायरे त्यांनी गाजवले आहेत.त्यांना ऐकणं ही औरंगाबादकरांसाठी मोठी पर्वणी ठरणार आहे.

# धारतीर्थ येथे आलेल्या यात्रेकरूस पुरातन विभागाच्या कर्मचाऱ्याने केली मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार:** गेल्या दोन दिवसापासून वाशिम जिल्हयातील रिसोड तालुक्यातील लोणी येथील संत सखाराम महाराज यांची यात्रा सुरू आहे. यानिमित्ताने मराठवाडयातील लाखो भाविक मोठया प्रमाणात लोणार वरून लोणीकडे जात असतात. यावेळी लोणी येथे जात असताना नेहमीप्रमाणे भाविक लोणार धारतीर्थ येथे भेट देउन पुढे यात्रेकसाठी रवाना होत असतानाच मराठवाडयातील अशाच एका वयोवृध्दास लोणार धारतीर्थ येथे असलेल्या भाविकाने धारेखाली आंघोळ केली या कारणावरून मारहाण केली. या घटनेचा तिव्र निषेध गावकऱ्यांकडून होत असून दोषी असलेल्या पुरातन विभागाच्या कर्मचाऱ्यावर कार्यवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे.मराठवाडयातील वयोवृध्द हे आपल्या कुंटुबासह लोणी येथे यात्रेला जात असताना लोणार येथे असलेल्या धारतीर्थ येथे स्नान करून पुढे जावे या उददेशाने या वयोवृध्द यात्रेकरूने नेहमीप्रमाणे धारेखाली आंघोळ केली. या गोष्टीचा राग पुरातन विभागाच्या कर्मचाऱ्यास संताप येताच या कर्मचाऱ्याने सदर यात्रेकरूस समजावून न सांगता मारहाण सुरू केली. यावेळी त्या ठिकाणी जमलेल्या यात्रेकरूने मध्यस्थी करून हा वाद मिटवला पंरतु धारेवर आंघोळ करणे बंद असल्याची कोणतीही बाब संबधीत पुरातन विभागाच्या कर्मचारी यांना न सांगता मारहाण करणे योग्य आहे का? कर्मचारी यांना मारण्याचा अधिकार पुरातन विभागाने दिलेला आहे काय असे अनेक प्रश्न निर्माण होत आहे. बाहेरगावावरून आलेल्या पर्यटकाना जर अशा प्रकारची वागणुक मिळत असेल तर पर्यटक यापुढे येणार नाही या घटनेची माहीती लोणार शहरात पसरताच सर्वत्र पुरातन विभागाच्या या कृत्याबददल तिव्र निषेध व्यक्त होत असुन संबधीत कर्मचारी यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी जोरधरत आहे.



# संभाजीनगर येथे ज्योतिष शास्त्राचे तिसरे महासम्मेलन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** योगीराज ज्योतिष अनुसंधान संस्था संभाजीनगर यांच्या वतीने दिनांक 12 व 13 डिसेंबर 2022 असे दोन दिवशीय तिसरे महासंमेलन होणार आहे. या संमेलनासाठी भारतातुन सर्व नामांकित ज्योतिषी विद्वानांची उपस्थिती राहणार असून या संमेलनात नामांकित आणि सुप्रसिद्ध ज्योतिषांचे मार्गदर्शन मिळणार आहे. म्हणून ज्योतिषशास्त्रातील या प्रमुख वक्त्यांचा सर्वांनी लाभ घ्यावा व या संमेलनासाठी ज्योतिषांनी जास्तीत जास्त संख्येने यावे तसेच वैदिक कर्मकांड व कुंडली ज्योतिष करणाऱ्यांनी सुद्धा या संधीचा लाभ घ्यावा अशी विनंती आणि आवाहन योगीराज ज्योतिषानुसंधान संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा आणि संमेलनाच्या आयोजिका डॉ.सीमा देशमुख यांनी केले आहे. महाज्योतिष संमेलनात सहभागी होणाऱ्या ज्योतिषांना प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन सन्मानीत करण्यात येणार असून या संमेलनामध्ये महाराष्ट्रातून आणि भारतातून ज्योतिषशास्त्रातील सर्व विषयावर अतिशय




महत्त्वपूर्ण ज्योतिषविषयक मार्गदर्शन मिळणार असल्याने ज्योतिषांनी आणि ज्योतिष्य प्रेमींनी आपली त्वरीत नोंदणी करावी असे देखील आवाहन समितीचे कार्याध्यक्ष पंडित विजय कुलकर्णी आणि डॉ. दिलीप कुलकर्णी यांच्या वतीने करण्यात आले आहे. तर हे संमेलन पूर्णपणे यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. सीमा देशमुख व प्रसिद्धीप्रमुख विष्णू मुके शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली योगीराज ज्योतिषानुसंधान संस्थेतील सर्व पदाधिकारी विशेष परिश्रम घेत आहेत.

# शेर ए टिपू सुलतान जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपळगाव काळे :** जळगाव जामोद मधील पिंपळगाव काळे येथे शेर ऐ टिपू सुलतान जयंती मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात दि 21/11/2022 रोज सोमवार रोजी साजरी करण्यात आली.सर्वधर्मसमभाव या पद्धतीने सर्व गावकरी मंडळींनी जयंती मध्ये सहभागी झाले. हम सब एक है। या पद्धतीने संपूर्ण गावातून शेर ऐ टिपू सुलतान जयंतीचा मिरवणूक रथ निघाला. सर्वांचा उत्स्फुर्त सहभाग या मिरवणुकी मध्ये दिसून आला.सर्वधर्मसमभाव चा नारा पुन्हा एकदा या जयंतीच्या माध्यमातून पिंपळगाव काळे येथे पाहायला मिळाला. मिरवणूक रथ चांगल्या प्रकारे निघावा यासाठी अशपाक कुरेशी,जावेद शाह,सोहेब मिर्झा,शाकिर कुरेशी,शे.आवेश आदी मुस्लीम बांधवांनी अथक परिश्रम घेतले.

संपूर्ण गावातून मिरवणूक रथ विसर्जन हे ग्रामपंचायत जवळील ताज नगर येथे करण्यात आले.त्यावेळी मा जि प अध्यक्ष प्रकाश भाऊ पाटील यांनी शेर ऐ टिपू सुलतान बद्दल मार्गदर्शन केले.वंचित बहुजन आघाडी ता. उपाध्यक्ष श्रीकृष्ण गवई सर यांनी शेर ऐ टिपू सुलतान म्हैसूरचा शेर असून ब्रिटिश साम्राज्याला सुद्धा आव्हावन देणारा वाघ होता अशा पद्धतीने माहिती सांगितली.शेवटी आभार प्रदर्शन शे. रफिक शे. करीम शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांनी केले.

त्यावेळी असंख्य मुस्लिम समाज बांधव व मोठ्या प्रमाणात गावकरी मंडळी उपस्थित होते.

# सर्पमित्र निर्भय साखला यांनी पकडला अतिविषारी घोणस जातीचा साप



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आज सुरत बायपास जवळ पाचशे कॉटर येते अत्यंत विषारी घोणस जातीचा साप पकडण्यात आला हा साप भारतातील अतिशय विषारी सापांपैकी एक आहे. मध्यरात्री एस.डी.आर.एफ चे सर्पमित्र कनैयालाल यांना कॉल आला परंतु रात्री साप न दिसल्याने सकाळी त्या ठिकाणी आढळून आला तो अतिशय विषारी असल्यामुळे कन्हैयालाल यांनी सर्पमित्र निर्भयसाखला यांना फोन करून बोलवण्यात आले व त्या ठिकाणी पोहोचताच त्या सापाला पकडण्यात यश आले. त्याने काही भक्ष खाल्ल्यामुळे तो रात्रीपासून एकाच जागी होता त्याला पकडून जवळील नकाने तलाव हद्दीतील नैसर्गिक अधिवासामध्ये सोडण्यात आला.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in